## सलाम 'ती'च्या कर्तृत्वाला : जागतिक महिला दिन विशेष...



आज महिला सर्वच क्षेत्रांमध्ये कार्यरत असून अनेक ठिकाणी सक्षम नेतृत्वदेखील करीत आहेत. पूर्वी केवळ चूल आणि मूल सांभाळणारी स्त्री नव्या युगात शिक्षण, उद्योग, राजकारण, विज्ञान, क्रीडा अशा प्रत्येक क्षेत्रात आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करत आहे. जिद्दीने, कष्टाने आणि आत्मविश्वासाने तिने अनेक अडथळ्यांवर मात केली आहे. संकटांना सामोरे जात ती प्रत्येक क्षेत्रात आपली छाप उमटवत आहे. घर आणि करिअर यांचा समतोल राखत समाजाला दिशा देण्याचे मोठे कार्य आजची महिला करत आहे. अशाच काही कर्तृत्ववान महिलांच्या कार्याचा आढावा दै. रामप्रहरने जागतिक महिला दिनानिमित्त आजच्या अंकात (पान क्र. ४, ६, ७) घेतला आहे. महिला दिनाच्या सर्व मातांना, भगिनींना आणि लेकींना मनःपूर्वक शुभेच्छा!


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २२९
www.ramprahar.com

◆ रविवार, ८ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


### अंतरंग


मंत्री गणेश नाईक यांच्याकडून जखमी विद्यार्थ्यांची विचारपूस/२

रयत शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा कार्यशाळा उत्साहात/३

रायगडात १४ मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदालत/५


# पाणंद रस्त्यांची सात-बारा उताऱ्यावर नोंद होणार -मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी वेधले शासनाचे लक्ष

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यात पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी सुरू असलेल्या मोहिमेबाबत आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे शासनाचे लक्ष वेधले होते. त्यानुसार राज्यातील पाणंद (शेत) रस्ते अतिक्रमणमुक्त करून त्यांची नोंद सात-बारा उताऱ्यावर करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

गाव नकाशावर दिसणाऱ्या शेत किंवा पाणंद रस्त्यांची नोंद सात-बारा उताऱ्यावरील 'इतर हक्क' या सदरात करण्यात येणार असून यासाठी ई-फेरफार प्रणालीमध्ये तांत्रिक बदल केले जात असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

राज्यात पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी मोहीम सुरू केली असून त्यामुळे भूमी अभिलेख विभागाने पाणंद रस्ते नकाशावर दिसत असल्यास त्यांची नोंद सात-बारा उताऱ्यावर करण्यात येणार




असल्याचे जानेवारी २०२६मध्ये निदर्शनास आले आहे. या मोहिमेचा भाग म्हणून सात-बारा उताऱ्यावर पाणंद रस्त्यांची नोंद घेण्यास सुरूवात केली काय व किती महिन्यांत ही मोहीम पूर्ण करण्यात येणार आहे, त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी दाखल केला होता.

राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या संदर्भात दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी मोगूम सुरू केली असून त्यामुळे भूमी अभिलेख विभागाने पाणंद रस्ते नकाशावर दिसत असल्यास त्यांची नोंद सात-बारा उताऱ्यावर करण्यात येणार आहे. २२ मे २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६च्या कलम १४३ आणि मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६च्या कलम ५ नुसार आदेश पारित करताना शेत रस्ता जात असलेल्या शेताचा गट नं./सर्वे नं. शेतरस्त्याची रूंदी, लांबी, दिशा व सीमा इत्यादीबाबत ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्क या सदरात नोंद घेण्याबाबत सक्षम अधिकारी/प्राधिकारी यांना दिशानिर्देश देण्यात आलेले आहेत. यानुसार क्षेत्रीयस्तरावर ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्क या सदरात नोंद घेण्यात येत आहेत. गाव नकाशावरील शेत/पाणंद रस्त्याची नोंद ७/१२ उताऱ्यावर इतर हक्क या सदरी नोंद घेण्यासाठी ई-फेरफार प्रणालीमध्ये नव्याने विकसन करण्याबाबत जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडून राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. या विकसनाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर संबधित नोंदी ऑनलाईन प्रणालीद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील.








## लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयात कला मंच आणि एआय केंद्राचे उद्घाटन

### मोखाडा येथील समारंभास मान्यवरांची लाभली उपस्थिती

**मोखाडा : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात कला मंच आणि कृत्रिम बुद्धिमत्ता केंद्राचे उद्घाटन तसेच वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात झाला. त्याचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते आणि संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

यावेळी बोलताना चेअरमन दळवी यांनी सांगितले की, आजचे युग हे तंत्रज्ञानाचे असून एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता ही प्रगतीची महत्त्वाची दिशा ठरत आहे. शिक्षण क्षेत्रात एआयचा वापर वाढत असून विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या आणि संशोधनाच्या अनेक नव्या संधी उपलब्ध होत आहेत. येथील महाविद्यालयात एआय केंद्राची स्थापना ही अत्यंत स्तुत्य बाब असून यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होईल आणि त्यांच्या कौशल्य विकासाला चालना मिळेल. विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक युगात टिकून राहण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करून नव्या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले तसेच या महाविद्यालयाचा ग्रामीण भागातील सर्वोत्कृष्ट कॉलेज म्हणून गौरव केला. **(पान २ वर..)**

## युद्धामुळे गॅस सिलिंडरच्या किमतीत वाढ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इराण विरुद्ध इस्त्रायल-अमेरिका यांच्यात मध्यपूर्व आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धाचा फटका भारतालाही बसला आहे. देशभरात घरगुती आणि व्यावसायिक दोन्ही गॅस सिलिंडरच्या दरात शनिवार (दि. ७)पासून वाढ करण्यात आली.

भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा एलपीजी आयात करणारा देश आहे. इराणने होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतल्याने जागतिक बाजारपेठेतील जवळजवळ सर्वच क्षेत्रापुढे नवी समस्या निर्माण झाली आहे. भारतात घरगुती वापराच्या १४.२ किलोंच्या सिलिंडरचे दर ६० रुपयांनी वधारले असून व्यावसायिक वापराच्या सिलिंडरच्या किमतीत तर ११५ रुपयांची वृद्धी झाली आहे.






## चित्रकार किशोर ठाकूर यांना पुरस्कार

**रायगड :** राज्य शासनाच्या कला संचालनालयाच्या




वतीने दिला जाणारा वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार सन २०२३-२४ या वर्षासाठी पेण तालुक्यातील कोप्रोली येथील ज्येष्ठ चित्रकार किशोर ठाकूर यांना जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण सोहळा १० मार्च रोजी सायंकाळी ५.३० वा. मुंबईतील जहांगीर आर्ट गॅलरी येथे पार पडणार आहे.

## टी-२० वर्ल्डकपमध्ये आज भारत-न्यूझीलंड मेगा फायनल

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना भारत आणि न्यूझीलंड यांच्यात रविवारी (दि.८) अहमदाबाद



येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळला जाणार आहे. गतविजेता म्हणून भारताचे सलग दुसऱ्यांदा जेतेपद मिळवण्याचे लक्ष्य आहे, तर न्यूझीलंडचे लक्ष त्यांच्या पहिल्या टी-२० विश्वचषकाच्या जेतेपदावर आहे.

भारत आणि न्यूझीलंड टी-२० विश्वचषक फायनलमध्ये एकमेकांसमोर येण्याची ही पहिलीच वेळ आहे. उभय संघ यापूर्वी वनडे आणि कसोटी स्पर्धांच्या फायनलमध्ये आमनेसामने आले आहेत. २०२१मध्ये पहिल्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) फायनलमध्ये न्यूझीलंडने भारताचा आठ विकेट्सने पराभव करून ट्रॉफी जिंकली. यानंतर २०२५मध्ये भारताने न्यूझीलंडवर चार विकेट्सने विजय मिळवत चॅम्पियन्स ट्रॉफी आल्या नावे केली. भारतीय संघाने इतिहासात टी-२० विश्वचषक स्पर्धेत न्यूझीलंडविरुद्ध एकही सामना जिंकलेला नाही. तिन्ही वेळा भारताला पराभव पत्करावा लागला आहे. यंदा टीम इंडियाने चांगली कामगिरी केल्याने अपेक्षा उंचावल्या आहेत.




# पीएचडी संशोधकांच्या फेलोशिप विलंबाचा आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून विधीमंडळात प्रश्न

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

दलित-बहुजन समाजातील पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत देण्यात येणाऱ्या मागील चार ते पाच वर्षांपासून फेलोशिपचा विषय आमदार प्रशांत ठाकूर यांनी तारांकित प्रश्नाद्वारे मांडला. त्यावर मंत्री संजय शिरसाट यांनी, टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत आणि इतर तत्सम स्वायत्त संस्थांमार्फत राबविल्या जाणाऱ्या अधिछात्रवृत्ती योजनेच्या निकष आणि नियमावलीबाबत योग्य कार्यवाही लवकरच करण्यात येणार असून सध्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. विभागाचा अहवाल प्राप्त होताच योग्य ती कार्यवाही तत्काळ करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.




राज्यातील दलित-बहुजन समाजातील पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत देण्यात येणाऱ्या मागील चार ते पाच वर्षांपासून फेलोशिपच्या विलंबामुळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले असून पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांसाठी समान धोरण रद्द करून विद्यार्थ्यांच्या हिताचे न्यायपूर्ण धोरण राबविण्याची मागणी समर्थन संस्थेने मुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री, महासंचालक, डॉ. बाबासाहेब संशोधन आणि प्रशिक्षण व मानव विकास संस्था यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे २२ डिसेंबर २०२५ रोजी वा त्यादरम्यान केली आहे. याबाबत शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने सदर भागातील विद्यार्थ्यांसाठी बार्टी, सारथी व महाज्योती इत्यादी संस्थेच्या पीएचडी फेलोशिप जाहिरात नियमित प्रसिध्द करण्यासाठी व इतर काही मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केला होता.

राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी लेखी उत्तरात सांगितले की, राज्यातील दलित-बहुजन समाजातील पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत देण्यात येणाऱ्या मागील चार ते पाच वर्षांपासून फेलोशिपच्या विलंबामुळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याची बाब खरी असून सन २०२२पर्यंत स्वायत्त संस्थांमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती/शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला आहे. सन-२०२२मध्ये बार्टी (विद्यार्थी संख्या ७६३), सारथी (विद्यार्थी संख्या १३२९), महाज्योती (विद्यार्थी संख्या १४५३ अशा एकूण ३५४५ संशोधक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती/शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व इतर तत्सम स्वायत्त संस्थांमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती/शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याकरिता सन २०२३ व सन २०२४ या वर्षाच्या अधिछात्रवृत्ती योजनेची जाहिरात प्रसिद्ध करावयाची कार्यवाही सुरू आहे. टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व इतर तत्सम स्वायत्त संस्थामार्फत सर्वंकष धोरणातंर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींचा आढावा व या स्वायत्त संस्थांच्या वार्षिक कृती आराखड्यास मान्यता देण्याच्या अनुषंगाने उपरोक्त विषयाबाबत मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली ११ सप्टेंबर २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत अधिछात्रवृत्ती योजनेंतर्गत युजीसीमार्फत विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करून अधिछात्रवृत्ती योजनेचे निकष उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तयार करावेत. यामध्ये विद्यार्थ्यांचा वार्षिक प्रगती अहवाल तपासून उर्वरित अनुदान वितरीत करण्याच्या प्रक्रियेचा समावेश करून त्यानुसार कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसांत सादर करावा, अशा उच्च व तंत्र शिक्षण विभागास सूचना देण्यात आल्या होत्या.

यापूर्वी टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व इतर तत्सम स्वायत्त संस्थांमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती/शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याकरिता विद्यार्थ्यांमार्फत करण्यात येणाऱ्या आंदोलनाच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री नगर विकास, गृहनिर्माण व सा.बां. (सा.ऊ.) महोदयांच्या अध्यक्षतेखाली २८ ऑक्टोबर २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अहवाल तातडीने सादर करावा, असे निर्देश देण्यात आले होते. यानुषंगाने या विभागामार्फत टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व इतर तत्सम स्वायत्त संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती योजनेचे निकष व नियमावलीसंबंधी पुढील उचित कार्यवाही लवकरात लवकर करणेबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागास विनंती करण्यात आली होती. याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून त्यांचा अहवाल प्राप्त होताच पुढील योग्य ती कार्यवाही तत्काळ करण्यात येईल.

## पेणमध्ये आदिवासी विकास परिषद आणि गौरवशाली इतिहास कार्यक्रम



**पेण : प्रतिनिधी**

आदिवासी समाजाचे गेल्या चार दशकांपासून प्रलंबीत प्रश्न समस्याबाबत जेवढे मला मनापासून करता येईल त्यासाठी या खात्याचा मंत्री व कार्यभार माझ्याकडे असून आदिवासी कातकरी समाजातील शेवटच्या झोपडीपर्यंत रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा लाभ मिळावा व आदिवासी संस्कृती गौरवशाली इतिहासाला उजाळा मिळावा यासाठी नाशिक, जळगाव, पाठोपाठ पेणमध्ये या परिषदेचै आयोजन करण्यात आले असल्याचे आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. ना. अशोक वुईके यांनी पेणमध्ये आयोजित आदिवासी विकास परिषदेत सांगितले.

विकासाचे पर्याय आणि प्रकल्प कार्यालयीन अधिकारी कर्मचारी यांनी शासनाच्या विविध योजनांची पुर्तता कशी होईल जेणेकरून या समाजबांधवना आपली संस्कृती व इतिहास परंपरा आदिवासीचे देव यांचं जतन व संस्कार सोपी पायवाट नव्या पिढीला समजावे हाच या आदिवासी विकास परिषदेचा मुख्य हेतू असल्याचे ते म्हणाले .

पेणमध्ये आदिवासी विकास परिषद व गौरवशाली इतिहास कार्यक्रम येथील सौभाग्य इन हॉटेलच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास आदिवासी विकास मंत्री मा. अशोक उईके, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील, मंत्री भरत गोगावले, आमदार रविशेठ पाटील, शिक्षक मतदार संघ आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, पद्मश्री पुरस्कार विजेते परशुराम गंगावणे, अप्पर आयुक्त गोपीचंद कदम, पेणच्या नगराध्यक्षा प्रितम पाटील, पेण आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, मानव निरगुडा, दत्तात्रेय सुपे, नागू लेंडी, पंचायत समिती सदस्य, आदिवासी ठाकूर समाजाचे पदाधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी आदिवासी समाजभवन निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाकडे दिला असून सुधागड तालुक्यातील पंचवीस एकर जागेची निवड सुध्दा करण्यात आली असल्याचे सांगितले. या भवनामध्ये सुसज्ज असे आरोग्य केंद्र, महिला बचतगटांसाठी प्रशिक्षण केंद्र होणार असल्याचे सांगितले. आता यासाठी पहिल्या प्रथम पन्नास कोटी नंतर पन्नास कोटी असे १०० कोटींचा बजेट असलेल्या या आदिवासी भवनाची निर्मितीसाठी आपण प्रयत्न करावेत आमचे यासाठी सर्व सहकार्य लाभेल अशी मागणी मंत्री अशोक वुईके यांच्याकडे केली.

यावेळी खासदार धैर्यशील पाटील , आमदार रविशेठ पाटील, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, नगराध्यक्ष प्रीतम पाटील यांचीही भाषणे झाली.या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी समाजातील पारंपरिक वस्तू आदिवासी वारली कलेच्या वस्तूचे स्टॉल. आदिवासी संस्कृती विविध नृत्य प्रकार यांचे मंत्री व पाहुण्यांना प्रारंभी दर्शन घडविल्याने एकंदर उत्साही माहोल दिसून आला. आदिवासी महिला बचत गटांना चार लाखांचे धनादेश व वैयक्तिक लाभाच्या शिवणयंत्र पेणमधील तीन महिलांना वाटप करण्यात आले.

प्रास्ताविकात अप्पर आयुक्त गोपीचंद कदम यांनी आदिवासी प्रकल्प विभागातील प्रशासकीय कामाची व विकास योजनांबाबत माहिती दिली.

## उरणकरांच्या आरोग्य सुविधेसाठी 'आयुष्यमान' पाऊल -आमदार महेश बालदी

**उरण : रामप्रहर वृत्त**

मतदारसंघातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम आणि अद्यावत व्हावी, हा आपला नेहमीच प्रयत्न राहिला आहे. याच उद्देशाने आज उरण येथे १५व्या वित्त आयोग कार्यक्रमांतर्गत 'आयुष्यमान भारत -ब्लॉक पब्लिक हेल्थ युनिट'चे उद्घाटन होत असल्याचे प्रतिपादन आमदार महेश बालदी यांनी केले.

तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना तातडीच्या आणि दर्जेदार आरोग्यसेवा आता स्थानिक पातळीवरच उपलब्ध होणार आहेत. 'आरोग्यसंपन्न उरण' घडवण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे त्यांनी सांगितले

याप्रसंगी उरणचे गट विकास अधिकारी सर्जेराव पाटील, जसिम गॅस (सभापती - स्वच्छता, वैद्यक आणि सार्वजनिक आरोग्य शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक कार्य समिती), उरण पंचायत समिती सदस्य कैलास भोईर, तालुका अध्यक्ष धनेश गावंड, तालुका अध्यक्ष प्रसाद भोईर, महिला अध्यक्ष राणी म्हात्रे, महालण विभाग अध्यक्ष महेश कडू, युवा शहर अध्यक्ष निलेश पाटील, तसेच आरोग्य विभागाचे सर्व अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कलागुणदर्शन स्पर्धेला महिलांचा उत्साही प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांच्या अंगभूत कलागुणांना उत्तेजन देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. ४ ते ६ मार्च या कालावधीत महात्मा फुले स्मृती भवन, सेक्टर-३, वाशी, नवी मुंबई येथे संपन्न झालेल्या या स्पर्धांना महिला समुहांचा उत्साही सहभाग लाभला.

यामध्ये समुह गायन स्पर्धेत १० महिला समुहांनी सहभाग घेतला तसेच समुह



नाटिका स्पर्धेत ३ महिला नाटयसमुह सहभागी झाले. समुह नृत्य स्पर्धे दोन गटांमध्ये घेण्यात आली. त्यामध्ये १८ ते ४० वयोगटातील स्पर्धेत ६ नृत्य समुह तसेच ४० वर्षे वयापुढील समुह नृत्य स्पर्धेत ९ नृत्य समुहांनी उतस्फुर्त सहभाग घेतला.

१० महिला भजन मंडळांनी महिला भजन स्पर्धेत सहभागी होउुन आपले कलागुण दर्शन घडविले. महिलांच्या अतिशय आवडत्या मंगळागौर स्पर्धेत ५ महिला समुहांनी सहभागी होउुन हा उपक्रम यशस्वी केला. महिला सुरक्षितता विषयक जनजागृती, पर्यावरण, शिक्षण या तीन विषयांवर आयोजित लहान व्हिडीओ स्पर्धेमध्ये ४ समुहांनी सहभाग घेतला होता.

पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयात कला मंच आणि एआय केंद्राचे उद्घाटन

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मनोगतात संस्थेच्या कार्याचा गौरव केला. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम बनविण्याचे कार्य संस्थेने सातत्याने केले असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी शाळेच्या विकासासाठी आणखी ३८ लाख रुपयांची देणगी जाहीर केली. यापूर्वीदेखील त्यांनी ६२ लाख रुपयांची देणगी दिली होती. कार्यक्रमाला आमदार सुनील भुसारा, नगराध्यक्ष अमोल पाटील, संस्थेचे व्हाईस चेअरमन भगीरथ शिंदे, जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव एस.टी. गडदे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य प्रकाश निकम, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या पुस्तिकेचे प्रकाशन तसेच महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.



## जागतिक महिला दिनानिमित्त चर्चासत्र

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने यशवंतराव चव्हाण सेंटरच्या नवी मुंबई जिल्हा केंद्र, नवी मुंबई मराठी साहित्य, संस्कृती आणि कला मंडळ तसेच नवी मुंबई स्वयंसेवी संघटना समन्वय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबईतील या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी नवी मुंबई साहित्य, कला आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष सुभाष कुलकर्णी होते. यशवंतराव चव्हाण सेंटर नवी मुंबई केंद्राचे अध्यक्ष प्रमोद कर्नाड यांनी उपस्थितांचे स्वागत केले, तर यशवंतराव चव्हाण सेंटरचे मानद कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळसराफ यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन महिला विभागप्रमुख साधना तिप्पनाकजे यांनी केले. या चर्चासत्राला चव्हाण सेंटरच्या नवी मुंबई केंद्राचे पदाधिकारी, यशस्विनी नवी मुंबई समन्वयक मनिषा




देसाई आणि नवी मुंबईतील शंभरच्या वर सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने यशवंतराव चव्हाण सेंटरच्या महिला विभागातर्फे चारही महिला धोरणांचा आढावा घेणाऱ्या चर्चासत्रांचे आयोजन संपूर्ण राज्यात करण्यात येत आहे. या चर्चासत्रांची सुरुवात गुरुवार, ५ मार्च २०२६ रोजी नवी मुंबईतील साहित्य मंदिर सभागृहात झाली.

महिला लोकप्रतिनिधी, आशा कार्यकर्त्या आणि अंगणवाडी सेविका यांच्याद्वारे गाव चालवण्याची जबाबदारी महिलांवर सोपवली जाणे, हा महिला धोरणांमुळे झालेला एक महत्त्वपूर्ण बदल आहे. काही वर्षांपूर्वी महिला उमेदवार शोधणे कठीण होते, परंतु आता राजकारणात महिलांची स्पर्धा वाढली आहे. मात्र, त्याचबरोबर महिला लोकप्रतिनिधी मोठ्या प्रमाणात 'यू-टर्न' घेत असल्याचेही दिसून येते. बजेट तयार करतानाही महिलांना अद्याप पुरेसे सामावून घेतले जात नाही, असे मत रिसोर्स अँड सपोर्ट सेंटरचे संचालक भीम रास्कर यांनी 'धोरण कुठंवर आलं गं बाई!' या चर्चासत्रात व्यक्त केले.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या हसिना खान, स्त्री मुक्ती संघटनेच्या पदाधिकारी वृषाली मगदूम आणि रिसोर्स अँड सपोर्ट सेंटरचे संचालक भीम रास्कर या वक्त्यांनी महिला धोरणांतील काही तरतुदींच्या अंमलबजावणीत येणाऱ्या आव्हानांवर प्रकाश टाकला. या आव्हानांवर मात करून तळागाळातील महिलांपर्यंत धोरणे यशस्वीपणे कशी राबवता येतील, यावरही त्यांनी मार्गदर्शन केले.

## मंत्री गणेश नाईक यांच्याकडून जखमी विद्यार्थ्यांची विचारपूस

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे येथे इमारतीचा स्लॅब कोसळून टयुशन शिकण्यासाठी आलेले विद्यार्थी जखमी झाल्याची दुर्घटना घडली होती. या अपघातामध्ये एका विद्यार्थ्याच्या दुर्दैवी मृत्यू देखील झाला आहे.

या अपघातातील जखमी विद्यार्थ्यांवर नवी मुंबईतील विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. नवी मुंबईतील कोपरखैरणे सेक्टर-२ येथील विद्या भवन सोसायटीत एका घरगुती क्लासमध्ये विद्यार्थी शिक्षण घेत असताना स्लॅब कोसळण्याची अत्यंत धक्कादायक घटना घडली.

राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी वाशी व कोपरखैरणे येथील रुग्णालयांना भेट देत जखमी नागरिक व विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची माहिती घेतली. त्यांनी डॉक्टरांशी सविस्तर चर्चा करून जखमींना सर्वोत्तम उपचार मिळावेत, अशा स्पष्ट सूचना दिल्या तसेच पालिका व पोलीस प्रशासनाकडून या दुर्घटनेबाबत सविस्तर माहिती घेतली.



दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# रयत शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा कार्यशाळा उत्साहात

## शिक्षकांनी नव्या कल्पना आत्मसात कराव्यात –चेअरमन चंद्रकांत दळवी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा सातत्याने विकास व्हावा आणि बदलत्या शैक्षणिक गरजांनुसार शिक्षक व प्रशासकीय यंत्रणा अधिक सक्षम व्हावी या उद्देशाने रयत शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा २०२६ या विषयावर रायगड विभागीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ही कार्यशाळा संस्थेच्या कामोठे येथील रायगड विभागीय कार्यालय सभागृहात मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यशाळेला व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, उपाध्यक्ष पी.जे. पाटील, जयश्रीताई चौगुले, सचिव विकास देशमुख, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, नवी मुंबईचे उपमहापौर व संस्थेचे जनरल बॉडी सदस्य दशरथ भगत, नगरसेवक परेश ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते. शिक्षणातील गुणवत्ता



वाढवण्यासाठी आवश्यक असलेले आधुनिक अध्यापन तंत्र, विद्यार्थीकेंद्रित शिक्षण पद्धती, मूल्यमापनातील नव्या संकल्पना आणि शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या उपक्रमांवर यावेळी चर्चा करण्यात आली.

अध्यक्षीय मार्गदर्शनात संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी रयत शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा २०२६ या संकल्पनेविषयी सविस्तर माहिती देत शिक्षकांनी शिक्षण प्रक्रियेत नव्या कल्पना आत्मसात करण्याची गरज अधोरेखित केली. शिक्षण हे केवळ ज्ञान देण्यापुरते मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे सांगून संस्थेच्या परंपरेला साजेशा गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

संस्थेचे सचिव विकास देशमुख, सहसचिव बंडू पवार, शिवलिंग मेनकुदळे, राजेंद्र मोरे यांनी गुणवत्ता विकास आराखड्याचे सादरीकरण केले. द्वितीय सत्रात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विभागीय स्तरावर गुणवत्ता विकासाच्या उपक्रमांबाबत मार्गदर्शन केले, तर समारोपावेळी व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे यांनी आपल्या मार्गदर्शनातून संस्थेची स्वावलंबन, त्याग व शिक्षण क्षेत्रात नवीन दिशा देणारी चळवळ उभी केली आहे, असे प्रतिपादन केले.

कार्यशाळेत उपस्थित शिक्षक व अधिकाऱ्यांनी विविध मुद्द्यांवर आपले अनुभव मांडले आणि गुणवत्ता विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी कशी करता येईल याबाबत चर्चा केली. या संवादातून अनेक विधायक सूचना पुढे आल्या. कार्यशाळेस संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, जनरल बॉडी सदस्य, लाईफ मेंबर, लाईफ वर्कर, प्राचार्य, मुख्याध्यापक व टेक्नोसॅव्ही शिक्षक उपस्थित होते. कार्यशाळेचे नियोजन आणि समन्वय विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे आणि सहाय्यक विभागीय अधिकारी विलास जगताप यांनी केले. सूत्रसंचालन सागर रंधवे यांनी केले, तर आभार तुषार म्हात्रे यांनी मानले.



**पनवेल : येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात झालेल्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभामध्ये प्रमुख पाहुणे माजी सहसंचालक कोकण विभाग संजय जगताप, कार्यक्रमाचे अध्यक्ष रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांच्या हस्ते गुलाब बागवान याला आदर्श विद्यार्थी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी सोबत त्याची आई रिहाना बागवान व अन्य उपस्थित होते.**



**पनवेल : सिद्धिविनायक कॉम्प्लेक्सच्या वतीने होळीनिमित्त आयोजित कार्यक्रमात महापौर नितीन पाटील यांचा सत्कार करण्यात आला. या समारंभाला नगरसेवक राजू सोनी , माजी नगरसेविका नीता माळी यांच्यासह सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स मित्रमंडळातील महेश भालेकर, प्रसाद गायकवाड,मंदार खुर्द, संतोष खुर्द, तुषार रसाळ, सुरेश कोटरिया, राहुल भालेकर आदी सदस्य उपस्थित होते.**

# महापौर नितीन पाटील यांनी जाणून घेतल्या ग्रामीण भागातील समस्या

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १मधील ग्रामीण भागातील विविध समस्या आणि रखडलेली विकासकामे मार्गी लावण्यासाठी महापौर नितीन पाटील यांनी प्रत्यक्ष पाहणी दौरा करून नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. प्रभागातील भाजपचे नगरसेवक नितेश पाटील, लीना म्हात्रे आणि विजयश्री पाटील यांच्या मागणीनुसार हा दौरा आयोजित करण्यात आला होता.

या पाहणीदरम्यान महापौर नितीन पाटील यांनी घोट, कोयनावळे, तळोजा मजकूर आणि सिद्धी करवले या गावांना भेट देऊन स्थानिक नागरिकांशी संवाद साधत पाणीपुरवठा, रस्ते, गटारे तसेच इतर मूलभूत सुविधांशी संबंधित समस्या जाणून घेतल्या. ग्रामीण भागातील प्रलंबित विकासकामांना प्राधान्य देऊन ती लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रशासनाशी समन्वय साधला



जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी महापौर म्हणाले की, नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष पाहून त्या सोडवण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील विकासकामे वेगाने पूर्ण करून नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे.

दरम्यान, प्रभागाची भौगोलिक परिस्थिती विस्तृत असल्यामुळे सर्व समस्या समजून घेण्यासाठी आणखी दोन दिवस पाहणी करावी लागेल अशी माहितीही महापौर पाटील यांनी दिली. या ौऱ्यामुळे नागरिकांच्या समस्या सोडवण्याच्या दृष्टीने सकारात्मक पाऊल उचलले गेल्याची भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.



**पनवेल : येथील महानगरपालिकेच्या स्वीकृत नगरसेवकपदी शिवसेनेचे ॲड. प्रथमेश सोमण यांची नुकतीच निवड जाहीर झाली. या निवडीनंतर शनिवारी ॲड. प्रथमेश सोमण यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. या प्रसंगी ॲड. प्रथमेश सोमण यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना पुष्पगुच्छ देत कृतज्ञता व्यक्त केली. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही ॲड. सोमण यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिला.**

## खून झालेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांचा पोलिसांकडून शोध

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहराजवळील उड्डाण पुलाखाली पैशाच्या वादातून विजय (पूर्ण नाव व पत्ता माहित नाही) या इसमाच्या डोक्यात दगडाने जखम करून त्याचा खुन झाला होता. या प्रकरणी सदर मयत इसमाच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

या इसमाचे नाव विजय (पूर्ण नाव व पत्ता माहित नाही) असे असून वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे, अंगात पांढर्या रंगाचा टी–शर्ट त्यावर लाल रंगात पाठीमागे वंदेमारतम् राष्ट्रगीताच्या १५० वर्षाचा गौरव सोहळा असे लिहिलेले आहे. तसेच टी–शर्टवर पुढील डाव्या बाजूस वंदे मातरम असे लिहिले आहे. उंची अंदाजे ५ फुट ६ इंच, सडपातळ बांधा, चेहरा उभट, केस काळे, उजव्या हाताच्या मनगटावर त्रिशुळ सारखे सरळ व उलटे गोंदलेले चिन्ह तसेच शंकराचे चिन्ह आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पो.नि.गुन्हे शाकीर पटेल यांच्याशी संपर्क साधावा.






## खांदा वसाहतीतील रस्ता झाला खड्डेमुक्त

**पनवेल : वार्ताहर**

खांदा वसाहतीमधील नागरिकांसाठी दिलासादायक बाब म्हणजे सेक्टर १३मधील खराब झालेल्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम अखेर पूर्ण करण्यात आले आहे. या कामासाठी नगरसेवक दशरथ म्हात्रे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पनवेल महापालिकेने तातडीने दखल घेत संबंधित रस्त्याचे डांबरीकरण व दुरुस्तीचे काम पूर्ण केले आहे.

खांदा वसाहतीतील सेक्टर १३ परिसरातील सिटी पार्क गेट ते कोकणदीप रेस्टॉरंट आणि वामा पॅराडाईज या दरम्यानचा रस्ता अतिशय खराब अवस्थेत होता. या रस्त्याचे काम पूर्ण झाल्याने स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून नगरसेवक दशरथ म्हात्रे यांचे आभार मानले आहेत.









# आदिवासी भागात समाजसेवा करणाऱ्या वसुधा सहस्रबुद्धे

रसायनी परिसरातील आदिवासी महिला, मुलांसाठी काम करणारी; सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत एक व्यक्ती म्हणून वसुधा सहस्रबुद्धे यांचे नाव या भागातील नागरिक घेत असतात. गेली ४८ वर्षे त्यांचे वास्तव्य रसायनीत आहे. त्या मूळच्या नागपूरच्या. लग्नानंतर एचओसी कॉलनी व नंतर रीस येथे त्यांचे वास्तव्य आहे.

वसुधा सहस्रबुद्धे या मागील २० वर्षांपासून वनवासी कल्याण आश्रमाचे काम करीत आहेत. याचबरोबर संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान या संस्थेतर्फे नैतिक शिक्षण योजना मुलांसाठी महाराष्ट्रभर चालू आहे. त्याची रसायनी विभागाची संयोजिका म्हणून त्या २०१४पासून काम करीत आहेत. आपली संस्कृती व प्राचीन इतिहास, प्राचीन ग्रंथ यांची ओळख मुलांना करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी रामायण, महाभारत, संतकथा व क्रांतिकारकांच्या गोष्टी ही पुस्तके असून त्यावर आधारित परीक्षा घेतली जाते. यावर्षी रसायनी परिसरातल्या १२ शाळांच्या १७०० विद्यार्थ्यांनी या योजनेमार्फत परीक्षा दिली. पहिली ते चौथीच्या मुलांसाठी तीन आनंदवर्गही घेतले जातात. त्याच्यामध्ये या मुलांना खेळ, श्लोक गाणी, गोष्टी व व्यायाम याची याद्वारे त्या मुलांना हसत खेळत शिकवले जातात. अर्थात, हे सगळे एकटीचे काम नव्हे. त्यांच्याबरोबर १७-१८ खंद्या कार्यकर्त्या आहेत. त्यांचे सहकार्य असल्यानेच हे काम बारा वर्षे सातत्याने चालू आहे, असे त्या आग्रहाने नमूद करतात.

रिसमध्ये संजीवनी प्रायमरी स्कूल नावाची एक शाळा आहे. या शाळेच्या कमिटीत वसुधा सहस्रबुद्धे असून तिथेही त्यांचे योगदान आहे. वनवासी कल्याण आश्रम रसायनी शाखेतही त्या बरीच वर्षे सुचेता जोशी, बीना रेगे यांच्याबरोबर शिक्षण आयामात काम करत आहेत. वनवासी मुलांसाठी संस्कारवर्ग घेत असतात. वाडीवरचीच एखादी मुलगी निवडून तिला प्रशिक्षण दिले जाते व ती रोज वाडीवर संस्कारवर्ग घेत असते.

या परिसरात आदिवासी पाडे बरेच आहेत. त्यांच्यासाठी वनवासी कल्याण आश्रमातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. बरीच वर्षे त्या स्फूर्ती महिला मंडळ चालवीत आहेत. तिथेही वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यात त्यांचा पुढाकार असतो. त्या संस्कृत शिक्षिका म्हणून सर्वांना परिचित आहेत. दहा वर्षे प्रिया स्कूलमध्ये व दहा वर्षे एचओसीच्या शाळेत त्या दोन्ही माध्यमांत संस्कृत शिकवत असत. त्यांना मराठी वाचन व लेखनाची आवड



आहे. त्या कविताही लिहित असतात. अनेक कार्यक्रमांचे सूत्रसंचालनसुद्धा त्यांनी केले आहे. गीता संथा वर्गही त्या आवडीने घेतात.

लक्ष्य फाऊंडेशन ही सीमेवरील जवानांसाठी काम करणारी संस्था आहे. या संस्थेतर्फे दरवर्षी कारगिल दिवस, दिवाळी भेट, एक जवान एक पणती हे उपक्रम तसेच फराळ भेट देणे, दिवाळीसाठी जवानांना शुभेच्छा पत्रे पाठवणे असे विविध उपक्रमही त्या यजमान विनोद सहस्रबुद्धे यांच्या जोडीने करत असतात. त्यात त्यांना प्रेरणा जल्लोष या संस्थेचे सभासद पूर्ण सहकार्य करतात.

पनवेलला भारत विकास परिषदेतर्फे दरवर्षी सैनिकांना दिवाळी फराळ पाठवला जातो. तिथे पॅकिंगच्या कामात त्या आवडीने सहभागी होतात. मी सर्व मी माझ्या आनंदासाठी करते, असे त्या नम्रतेने म्हणतात आणि समविचारी सहकारी मिळाल्यामुळे काही करू शकले, एकटीचे हे काम नाही, असेही त्यांनी सांगितले.

■ **बी.एस. कुलकर्णी, रसायनी**

# जनसेवेसाठी धावून जाणाऱ्या नगरसेविका ममता थोरे

भारतीय जनता पक्षाचे दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांच्या भगिनी आणि माणगाव नगरपंचायतीच्या नगरसेविका ममता थोरे या जनसेवेसाठी धावून जातात. म्हणूनच बहुजन समाजात त्यांचे नाव आज आदराने ममतादिदी म्हणून घेतले जाते.

नगरसेविका ममता थोरे या माणगाव नगरपंचायतीच्या सन २०२१-२२मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत वॉर्ड क्र.४ मधून दणदणीत मतांनी निवडून आल्या होत्या. विशेष म्हणजे त्या राहत नसलेला हा वॉर्ड होता. या वॉर्डातून निवडून येणे ही त्यांची एक अग्निपरीक्षा होती. या वॉर्डात त्यांचे थोरले बंधू भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी निवडणुकीच्या अगोदर या वॉर्डात जनतेशी सतत संपर्क ठेवून वेळोवेळी येथील ग्रामस्थांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी समजावून घेत त्या सोडवण्याचा प्रयत्न केला. शिवाय लोकांच्या सुखदुःखात ते जात असल्याने निलेश थोरे यांचे हे कार्य त्यांच्या भगिनी ममता थोरे यांच्या पथ्यात पडून त्या नगरसेवकपदी विराजमान झाल्या. यानंतर मिळालेल्या संधीच सोन करीत ममता थोरे यांनीही मागे वळून पाहिले नाही.

वडील कुंडलिक थोरे व बंधू निलेश थोरे यांचा जनसेवेचे आदर्श नजरेसमोर ठेवत भाजपच्या ८० टक्के समाजकारण व फक्त २० टक्के राजकारण या भावनेतून त्यांनी आपले कार्य सुरू केले. ग्रामस्थांच्या सुखदुःखाबरोबरच आपल्या वॉर्डातील विकासकामे करण्यावर त्यांनी भर दिला. विविध विकसकामे त्यांनी आपल्या प्रयत्नांनी या वॉर्डात केली.

महिलांना संघटित करून महिलांसाठी विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रम त्यांनी आपल्या चार वर्षाच्या कारकिर्दीत सातत्याने राबविले. ममता थोरे या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, कला, क्रीडा आदी क्षेत्रात सक्रिय सहभाग घेत असतात. आपल्याकडे काम घेऊन आलेल्या माणसाचे काम झाले पाहिजे यासाठी त्यांची नेहमीच तळमळ असते. गरीब-गरजू लोकांना मदत करणे या कामी त्या नेहमीच पुढे असतात.

समाजासाठी काम करताना एकदा माणगाव एसटी बसस्थाकावर एका अपंग व्यक्तीला महिला वाहकाने हीन वागणूक दिली होती. याबाबतची माहिती नगरसेविका ममता थोरे यांना समजल्यावर त्यांनी लगेचच आपल्या सहकाऱ्यांसह बसस्थानक गाठून महिला वाहकाला त्या अपंग




व्यक्तीजवळ माफी मागायला लावली. एवढ्यावरच त्या थांबल्या नाहीत तर त्यांनी त्या अपंग व्यक्तीला आपल्या परीने आर्थिक मदतीचा हात दिला. जनसेवेचा वसा त्यांनी जपला आहे.

# महिला संघटनांना प्राधान्य देणाऱ्या नंदिनी बामगुडे

महिलांना संघटित करून विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रमाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाकडे विशेष लक्ष पुरविणाऱ्या कर्तृत्वान महिला म्हणजे माणगाव नगरीच्या महिला व बालकल्याण समिती सभापती तथा आदर्श समतानगर महिला मंडळाच्या माजी अध्यक्ष नंदिनी नितीन बामगुडे यांचे नाव घेता येईल.

नंदिनी बामगुडे या माणगाव येथील प्रसिद्ध सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर तथा माणगाव नगरपंचायतीचे माजी नगरसेवक नितीन विष्णू बामगुडे यांच्या सुविद्य पत्नी आहेत. नंदिनी यांचे शिक्षण बीकॉम एलएलबीपर्यंत झाले असून एक उच्चशिक्षित महिला म्हणून त्यांची आदर्श संत नगरसह संपूर्ण माणगाव तालुक्यात ओळख आहे.




मितभाषी, सय्यमी अशा त्या व्यक्तिमत्व आहेत. माणगाव नगरपंचायतीच्या सन २०२१-२२मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत त्या वॉर्ड क्र.८ मधून नगरसेविका म्हणून निवडून आल्या होत्या. त्यानंतर त्यांनी आपल्या वॉर्डातील प्रलंबित विविध विकासकामे करण्यावर भर दिला. त्यांचे पती नितीन बामगुडे यांची समाजाप्रती असणारी तळमळ पाहून त्यांच्या खांद्याला खांदा लावून नंदिनी बामगुडे या आज बहुजन समाजात सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून काम करीत आहेत.

माणगाव नगरीच्या महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी पुन्हा एकदा नुकतीच त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. आपल्याला मिळालेल्या या संधीच सोने कारण्याच्या इराद्याने त्या नगरपंचायतीत काम करून महिलांचे प्रश्न सचोटीने सोडवीत आहेत.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी काम करताना त्यांच्या रूपाने आज माणगाव नगरीतील महिलांना एक आशेचा किरण दिसत आहे. महिलांनी आज सर्वच क्षेत्रात पुढे आले पाहिजे या मताने त्या समाजात काम करीत आहेत. त्यांचे कार्य हे महिलांना निश्चितच प्रेरणादायी आहे.

■ **सलीम शेख, माणगाव**



बसंती जैन या गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. पार्श्व महिला फाउंडेशन ही संस्था आणि त्यात कार्यरत असणाऱ्या २४ महिला यांच्या सहकार्याने त्या कार्य करीत आहेत. या काळात त्यांना समाजातील विविध घटकांसाठी असंख्य सामाजिक सेवा उपक्रम करण्याची संधी मिळाली आहे. त्यांच्या कामात कर्करोग शिबिरे आयोजित करणे, विविध आरोग्य शिबिरे आयोजित करणे, आदिवासी समुदायांना मदत करणे, झोपडपट्टीतील शालेय मुलांना मदत करणे, गरजू विद्यार्थ्यांसाठी शुल्क भरणे, बालगृहे, वृद्धाश्रमे आणि कर्करोग निवारागृहांसाठी स्वयंसेवा करणे आणि गरजू कुटुंबांना अन्नधान्य वाटणे यांचा समावेश आहे.



बसंती जैन यांनी झोपडपट्टीतील शालेय विद्यार्थ्यांसोबत अनेक शैक्षणिक

# सामाजिक कार्यात सक्रिय असणाऱ्या बसंती जैन

आणि प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित केले आहेत. विशेषतः आर्थिकदृष्ट्या वंचित आणि वंचित मुलांसाठी विविध प्रकल्प. त्यांनी विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी शाळांना भेटी दिल्या आहेत आणि अनेक सहयोगी व विकासात्मक उपक्रम राबवले आहेत. त्यांचे प्रकल्प नेहमीच नाविन्यपूर्ण आणि प्रभावी राहिले आहेत, जसे की दांडिया कार्यक्रमांमध्ये झोपडपट्टीतील मुलांसोबत आयोजन करणे आणि त्यांच्याशी संवाद साधणे, वृद्धाश्रमात दिवाळी साजरी करणे, विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी सांतासोबत उत्सव साजरा करणे, त्यांना संगीतावर नाचण्यास प्रोत्साहित करणे, अन्न आणि केक वाटणे. जेव्हा जेव्हा अन्न वाटले जाते तेव्हा जैन अन्न नेहमीच वाटले जाते. याशिवाय झोपडपट्टीतील मुलांना शाळेच्या पिशव्या देणे, शाळेचे गणवेश बनवणे, कर्जत, खोपोली, पनवेल आणि नेरळ यासारख्या गावांना तसेच आदिवासी डोंगराळ भागात जाऊन गरजूंना मदत करणे हादेखील त्यांच्या सामाजिक कार्याचा एक भाग आहे. त्यांनी रोटरी इंटरनॅशनल, रोटरॅक्ट, इनर व्हील, जितो, राजस्थानी महिला मंडळ, भारतीय जैन संघटना आणि पनवेल स्मार्ट मॉमीज यासारख्या विविध संस्थांशी विविध क्षेत्रात सहकार्य केले आहे. त्यांनी आजपर्यंत अनेक सामाजिक प्रकल्प पूर्ण केले आहेत.

सामाजिक कार्यासोबतच बसंती जैन यांनी धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे यशस्वीरित्या आयोजनदेखील केले आहे. त्यांना विष्णुदास भावे नाट्यगृहासारख्या मोठ्या सभागृहांमध्ये धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्याची संधी मिळाली आहे. त्यांनी जैन मंदिरे, जैन स्थानक आणि जैन समुदायासाठी धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले आहेत. त्या सामाजिक सेवा, धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सतत सक्रिय आहेत आणि अशाच प्रकारे योगदान देत राहतील.

■ **संजय कदम, पनवेल**

# आयर्न वूमन शितल गायकवाड



अभ्यासात हुशार तसेच निसर्गाने मजबूत देहयष्टी दिल्याने शितल गायकवाड यांचा रुबाबदारपणा चारचौघात उठून दिसणारा ठरला. आपल्या ज्ञानाचा व अंगातील गुणांचा गोरगरीब तसेच होतकरू मुलांना फायदा होईल याकडे त्यांनी लक्ष पुरविले आणि त्यामध्ये यश मिळवले. अशी शितलताई खोपोली-खालापूरकर नागरीकांची मनातील आयर्न वूमन म्हणून नावारूपास आली आहे.

सर्वसामान्य कुटुंबातील मुलगी घरात अन्नाचा कण नाही, उपासमार, त्याचबरोबर कपडालत्ता याची वानवा, सुदैवाने घरासमोरच ज्ञानाचे भंडार प्राथमिक शाळा, माध्यमिक तसेच महाविद्यालयीन शिक्षण घेण्यास कुठलीही अडचण नसल्याने शितल गायकवाड यांनी शिक्षण घेतले. शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्राची आवड असल्याने ज्युडो, कराटे प्रशिक्षण घेतले. उंच उडी, भालाफेक, थाळीफेक याचबरोबर कबड्डी, क्रिकेट यांसारख्या सांघिक खेळांमध्येही प्राविण्य मिळवले असल्याने घराशेजारी शिक्षण संस्थेत प्रशिक्षक म्हणून सेवा करण्याची संधी मिळाली. या संधीचे सोने करण्यात शितल गायकवाड यांनी कुचराई केली नाही.



२४ सप्टेंबर २०२४ रोजी कमानी ऑडिटोरियम, मंडी हाऊस दिल्ली येथे डॉ. शीतल गायकवाड यांना स्वातंत्र्यवीर वीर सावरकर नेशनल गव्हर्नमेंट अवार्ड देण्यात आला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसीच्या २० कॅडेट्सनी कागदापासून पिशव्या बनवल्या आणि त्या भाजीपाला मार्केट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय आणि रेल्वेस्थानकांवर वाटल्या. प्लास्टिकमुक्त महाराष्ट्र करण्यासाठी प्लास्टिक पिशव्या वापरू नका, कागदी पिशव्या वापरा असा संदेश त्यांनी दिला.

जागतिक युवा संघटना राष्ट्रीय युवा पुरस्कार फेडरेशन ऑफ इंडियातर्फे खालापूर तालुक्यातील कराटे प्रशिक्षक शितल गायकवाड यांना भारतरत्न डॉ. बी.आर. आंबेडकर राष्ट्रीय उत्कृष्टता पुरस्काराने दिल्लीत कार्यक्रमात गौरवण्यात आले. त्यांनी २३ वर्षाच्या आपल्या शैक्षणिक क्षेत्रातील कारकिर्दीत अनेक महिलांना कराटेचे शिक्षण देऊन निर्भय बनविले, तर महिला सक्षमीकरणात सिंहाचा वाटा उचलला आहे. याशिवाय, एनसीसीच्या शालेय विद्यार्थी विद्यार्थिनींना प्रशिक्षण देऊन देशाभिमान बिंबवला आहे. केंद्रीय मंत्री डॉ. महेंद्रनाथ पांडे, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थित हा सोहळा झाला होता.

शीतल गायकवाड यांना सरस्वतीबाई दादासाहेब फाळके इंटरनॅशनल आयकॉनिक वूमन अवॉर्ड, इंटरनॅशनल हेल्थकेअर अवॉर्ड, कॉमवेल्थ एक्सेलेन्स अवॉर्ड, वूमन सुपर अवॉर्ड, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार २०२३, शिवछत्रपती महाराष्ट्र शासन गौरव पुरस्कार २०२३, वूमन इंटरप्रेन्युर ऑफ द इअर २०२५ अशा पुरस्कांरानी गौरविण्यात आले आहे तसेच महात्मा गांधी ग्लोबल युनिव्हर्सिटी स्पोर्ट्स (मार्शल आर्ट) या विषयामध्ये डॉक्टरेट पदवी, मास्टर ऑफ मास्टर पाचवी डिग्री ब्लॅक बेल्ट (इंटरनॅशनल आठ गोल्ड मेडललिस्ट), कराटे पाचवी डिग्री ब्लॅक बेल्ट, कुंग फु ५पाचवी डिग्री ब्लॅक बेल्ट, ज्युडो तिसरी डिग्री ब्लॅक बेल्ट बॉक्सिंग, किक बॉक्सिंग, कुस्ती, सर्पमित्र या क्षेत्रात त्या अग्रस्थानी आहेत. यासोबतच स्टेट लेवल मेडल ३४३४ (२००१ ते २०२० ), नॅशनल लेवल मेडल २२२६ (२००१ ते २०२०), इंटरनॅशनल मेडल ७३४ (२००१ ते २०२०) असे मेडल मिळाले आहेत.

■ **अरुण नलावडे, खालापूर**

# युवा क्रिकेटपटू वैष्णवी माणकर

क्रिकेट हा भारताचा आत्मा मानला जातो. पुरुष क्रिकेटपटूंनी आजवर देशाला गौरव मिळवून दिला, पण आता महिला क्रिकेटपटूदेखील मैदानावर चमकत आहेत. महाराष्ट्राच्या मातीतून अशाच एका तेजस्वी क्रिकेटपटू वैष्णवी पृथ्वीराज माणकरचा उदय झाला आहे. यष्टीरक्षक म्हणून प्रसिद्ध झालेल्या वैष्णवी यांनी आपल्या जिद्दी, मेहनत आणि चपळाईच्या बळावर राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर आपले नाव कोरले आहे.

वैष्णवी माणकर या सांगली जिल्ह्यातील आष्टा गावच्या सुपुत्री आहेत. त्यास सांगली जिल्ह्यातील आष्टा तालुक्याचे दिवंगत आमदार विलास शिंदे यांची नात, जिल्हा बँकेचे सदस्य वैभव शिंदे व माजी पंचायत समिती उपसभापती भाग्यश्री शिंदे यांची सुकन्या तसेच माणगाव शहरातील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. महेंद्र माणकर यांच्या सूनबाई आहेत. घरातील शिस्त, प्रोत्साहन आणि खेळाविषयी असलेली ओढ यामुळेच वैष्णवींचा प्रवास सुरू झाला. सध्या त्या एमए इंग्रजी या विषयात उच्च शिक्षण घेत आहेत. शैक्षणिक क्षेत्रात प्रगती करत असतानाच त्यांनी क्रिकेटची आवड सातत्याने जोपासली. शिक्षण आणि खेळ यांचा उत्तम समतोल राखणाऱ्या वैष्णवी या आजच्या तरुणींसाठी आदर्श आहेत.

वैष्णवींचा क्रिकेट प्रवास २०१३मध्ये सुरू झाला, तेव्हा त्या केवळ ११ वर्षांच्या होत्या. त्या वयात बॅट आणि ग्लोव्हज हातात घेऊन त्यांनी स्वप्नांच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. सुरुवातीपासूनच यष्टीरक्षक या विशेष कौशल्यामुळे त्या इतरांपेक्षा उठून दिसल्या. दररोजच्या नेट्समधील अथक सराव, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि खेळाप्रती निष्ठा यामुळे त्यांनी आपले कौशल्य अधिकाधिक धारदार केले.

परिणामी अल्पावधीतच जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीय संघांमध्ये त्यांना स्थान मिळाले. यष्टीरक्षक ही क्रिकेटमधील अत्यंत जबाबदारीची आणि कठीण भूमिका आहे. सेकंदाच्या आत निर्णय घेणे, फलंदाजाला झेलबंद करणे, स्टंपिंग करणे तसेच प्रत्येक क्षणी सजग राहणे हे सर्व विकेटकीपरकडून अपेक्षित असते. वैष्णवींची हीच चपळाई, निर्णयक्षमता आणि सातत्यपूर्ण तयारी यामुळे त्या संघाच्या मागील बाजूस भक्कम आधारस्तंभ ठरल्या आहेत.



त्याचबरोबर फलंदाजीतही त्यांनी संघाला अनेकदा महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यांनी १९ ते २३ वयोगटातील विविध स्पर्धांमध्ये निवड मिळवून आपली उपयुक्तता सिद्ध केली.

जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय तसेच आंतरराज्यीय स्पर्धांमध्ये त्यांचे योगदान मोलाचे ठरले. विकेटकीपिंगबरोबरच फलंदाजीत त्यांनी अनेकदा संघासाठी महत्त्वपूर्ण धावा केल्या. त्यांच्या कामगिरीची दखल घेत वरिष्ठ खेळाडू व प्रशिक्षकांनी त्यांचा गौरव केला. वैष्णवींचा प्रवास सोपा नव्हता. ग्रामीण भागातील मुलींना खेळात संधी मिळणे तितकेसे सोपे नाही. समाजातील परंपरा, मर्यादा आणि सुविधांचा अभाव या सगळ्यांवर मात करीत त्यांनी स्वतः ची वाट निर्माण केली. त्यांच्या प्रत्येक यशामागे अथक परिश्रम आणि जिद्दीची कहाणी दडलेली आहे. त्यांनी सिद्ध करून दाखवले की, जर स्वप्न मोठं असेल आणि मेहनत प्रामाणिक असेल, तर कोणतीही शिखरे गाठता येतात.

वैष्णवींचे यश हे केवळ वैयक्तिक नाही, तर सामाजिकदृष्ट्याही महत्त्वाचे आहे. त्यांच्या कामगिरीमुळे आज अनेक तरुणींना क्रिकेटसारख्या खेळात सहभागी होण्याची प्रेरणा मिळत आहे. ग्रामीण भागातील मुलींनाही मोठ्या उंचीवर पोहचता येते हे त्यांनी दाखवून दिले आहे. त्या केवळ खेळाडू नाहीत, तर भावी पिढीसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. वैष्णवींचे ध्येय स्पष्ट आहे ते म्हणजे भारतीय महिला क्रिकेट संघात स्थान मिळवून देशासाठी खेळणे. त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळे आणि यष्टीरक्षणातील अप्रतिम कौशल्यामुळे त्या नक्कीच आपल्या स्वप्नांच्या शिखरावर पोहचतील. महाराष्ट्रासोबतच संपूर्ण भारताला त्यांचा अभिमान वाटेल, असा विश्वास सर्वत्र व्यक्त केला जात आहे.

वैष्णवी माणकर यांचा क्रिकेट प्रवास हा संघर्ष, मेहनत आणि चिकाटीचे उत्तम उदाहरण आहे. शिक्षण आणि खेळ यांचा समतोल साधत त्यांनी स्वतः चे वेगळे स्थान निर्माण केले आहे. आज त्या केवळ एक विकेटकीपर नाहीत, तर अनेक मुलींसाठी स्वप्नांची दिशा दाखवणारा दीपस्तंभ आहेत. त्यांचे यश हे समाजातील प्रत्येक तरुणीला सांगते - स्वप्ने बघा, ध्येय ठेवा आणि त्यासाठी लढा. यश नक्की मिळेल. नुकतीच वैष्णवीची महाराष्ट्राच्या एकदिवसीय पन्नास षटकांच्या क्रिकेट स्पर्धेसाठीही निवड झाली आहे.

आगामी काळात भारतीय महिला क्रिकेट संघात वैष्णवीचे नाव झळकताना पाहणे ही केवळ अपेक्षा नाही, तर खात्री आहे. महाराष्ट्राची ही कन्या देशाचे नाव जागतिक पातळीवर उज्ज्वल करेल याबद्दल कोणतीही शंका नाही. नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित महाराष्ट्र वूमन्स प्रीमियर लीगमध्ये विजेत्या पुणे वॉरियर संघाकडून खेळताना वैष्णवीने यष्टीरक्षक म्हणून बहारदार कामगिरी करत अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले व संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट महिला संघातून सांगलीच्या स्मृती मंधनापाठोपाठ सांगलीतल्या अनेक महिला क्रिकेटर चमकत असून त्यात वैष्णवीचे नाव अग्रक्रमावर आहे.

■ **सलीम शेख, माणगाव**

# सामाजिक-शैक्षणिक क्षेत्रातील संगीता ढेरे

उरण परिसरातील सामाजिक कार्यकर्त्या व शिक्षिका संगीता सचिन ढेरे यांनी महिला सक्षमीकरण, आरोग्य जनजागृती आणि शिक्षण प्रसार या क्षेत्रांत सातत्यपूर्ण व प्रभावी कार्य करत समाजात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. यांचे शिक्षण एमए बीएड आहे. त्या हिरकणी वृत्तपत्राच्या कार्यकारी संपादकदेखील आहेत. समाजकार्य करून पहिली ते दहावी विद्यार्थ्यांचे क्लासेसदेखील घेतात.



महिला सक्षमीकरण होण्यासाठी यांची नेहमीच धडपड राहते महिलांना रोजगार व स्वयंरोजगार कसा मिळेल याची कार्यशाळा घेऊन त्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा पाठपुरावा करतात. महिला दिनाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून त्या श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरणच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी बनविणे, बचत गटांना मार्गदर्शन करणे, आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करणे तसेच मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विविध उपक्रम राबवत आहेत. विशेषतः ग्रामीण व गरजू घटकांपर्यंत पोहचून त्यांनी केलेले काम उल्लेखनीय मानले जाते. त्यांच्या या सातत्यपूर्ण सामाजिक योगदानाची दखल विविध स्तरांवर घेण्यात आली असून त्यांना शासनाचा मानाचा अहिल्याबाई होळकर पुरस्कार जाहीर झाला आहे. याशिवाय रायगड भूषण, महाराष्ट्र भूषण यांसह एकूण १७ विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

संगीता सचिन ढेरे यांच्या कार्यामुळे परिसरातील अनेक महिलांना आत्मविश्वास मिळाला असून स्वावलंबनाकडे वाटचाल करण्याची प्रेरणा मिळत आहे. पुढील काळातही महिला व बालकल्याणासाठी अधिक व्यापक उपक्रम राबविण्याचा त्यांचा मानस असून महिला दिनाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

■ **दिनेश पवार, उरण**

# महिलांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे -आंचल दलाल

**अलिबाग : प्रतिनिधी**

महिला सर्व क्षेत्रांमध्ये काम करत आहेत. आपली वेगळी ओळख निर्माण करीत आहेत, असे असले तरी महिलांनी आर्थिकदृष्टया स्वावलंबी व्हायला हवे, असे प्रतिपादन रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी केले.

जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला अलिबाग प्रेस असोसिएशनतर्फे शनिवारी (दि.७) वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या वंदना विजय सुर्वे, देविका देवेंद्र पाबेकर, सारा अभिजित वर्तक, प्राची विवेक देवळे, प्रियांका अमोल घरत यांना तेजस्विनी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. रायगड पोलीस मुख्यालयातील जंजिरा सभागृहात आयोजित करण्यात पुरस्कार वितरण समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून पोलीस अधीक्षक आंचल दलाल बोलत होत्या.



यावेळी रायगड जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पुर्वा पाटील, अलिबाग नगरपरिषदेचे नगरसेवक संदीप पालकर, अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर, सर्व पदाधिकारी, सदस्य व तसेच वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

पोलीस अधीक्षक आंचल दलाल म्हणाल्या की, लग्नानंतर महिलेला सासरचे नाव मिळते. परंतु आई, वडीलांकडून मिळालेल्या संस्कारामुळे महिला घडते हे विसरून चालणार नाही. महिलेला घरातील पुरुषांची साथ मिळणे आवश्यक असते. पुरुषांची साथ मिळाली तरच महिला पुढे जाऊ शकतात. पुरुषांनी आपल्या घरातील महिलांना साथ दिली पाहिजे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाच्या प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे म्हणाल्या की, आजही समाजात महिलांना स्वतःला सिद्ध करावे लागते. तरीदेखील महिला खंबीरपणे उभ्या राहतात. पूर्वीपेक्षा आता महिलांना कौटूंबिक पाठींबा मोठ्या प्रमाणात मिळत आहे. महिलांच्या प्रगतीमध्ये कुटूंबाकडून मिळणारी मोकळीकता, आत्मविश्वास आणि पाठींबा महत्वाचा आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील म्हणाल्या की, महिलांनी विविध क्षेत्रात काम करतांना घरातील लोकांची काळजी घेताना आपली काळजीदेखील घ्यायला हवी.

अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर यांनी प्रास्ताविक केले. सुत्रसंचलन प्रफुल्ल पवार यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रदर्शन राजेश भोस्तेकर यांनी मानले.

## दुचाकीस्वाराचा अपघाती मृत्यू

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग वनविभागातील तिनविरा येथे कार्यरत असलेले वनरक्षक सुरज सारंगे मुरूड तालुक्यातील सर्वे येथील निवासस्थानी रात्री साडेदहाचे सुमारास दुचाकी वाहनाने जात असताना, नवीन रस्तासाठी नव्याने तयार करण्यात येत असलेल्या मोरी बांधकामाच्या खड्डयात पडून वनरक्षक सुरज सारंगे यांचा दुर्देवी मुत्यू झाला.

सदर नवीन मोरी बांधकामाचे ठिकाणी योग्य बॅरिकेट्स, सुचना फलक, रात्री स्पष्ट दिवसण्यासाठी रेडियम पट्टया,किंवा लाल दिवे नसल्याने ठेकेदाराच्या निष्काळजीपणाने हा अपघात घडला असून नाहक एक उमदया तरूण वनरक्षक सुरज सारंगे याच्या दुर्दैवाने या अपघातात मृत्यू झाला आहे, पाच दिवसापुर्वीच दोन जुळे अपत्याचा बाप झालेल्या वनरक्षक सुरज सारंगे यांच्या दुर्देवी मृत्यूबाबत सर्व थरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. या ठेकेदाराच्या निष्काळजीपणाबाबत संबंधीत प्राधिकरण व कंत्रादारांच्या विरोधात महाराष्ट्र वनरक्षक व वनपाल संघटना, शाखा अलिबागचे अध्यक्ष मयुरेश तावडे, व पदाधिकारी यांनी तीव्र रोष व्यक्त केला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक आपला श्वास -आमदार महेश बालदी

**चौक : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे सर्वांचाच श्वास, जगाच्या इतिहासातील 'हिंदवी स्वराज्य' संस्थापक, एक पराक्रमी योद्धा, प्रजादक्ष राज्यकर्ते आणि आदर्श प्रशासनकर्ते यांचे स्मारक चौक या ऐतिहासिक गावात उभे राहिले याचा अभिमान तुम्हा आम्हा सर्वांना आहे. शौर्य, स्वाभिमान आणि अन्यायाविरुद्ध लढण्याचे जिवंत प्रतीक म्हणून त्याकडे पाहिले जाईल, असे गौरवोद्गार आमदार महेश बालदी यांनी काढले.

ग्रुप ग्रामपंचायत चौकच्या सरपंच रितू ठोंबरे यांनी स्वखर्चाने आपल्या कुटुंबाच्या मदतीने चौक या ऐतिहासिक गावात बाजार पेठेतील ऐतिहासिक दगडी शाळेच्या आवारात शिवस्मारक उभे केले असून त्याचा लोकार्पण सोहळा आमदार महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात आला, त्या प्रसंगी ते बोलत होते.

आपले वडील सुधीर ठोंबरे व काका मोतीराम ठोंबरे यांच्या सहकार्याने हे स्मारक सरपंच रितू ठोंबरे यांनी उभे केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती, हिंदू तिथीनुसार शिवजयंती फाल्गुन महिन्याच्या शुक्ल पक्षातील तृतीया (तिसरी) तिथीला साजरी करण्याची परंपरा आहे, त्यानुसार हा लोकार्पण सोहळा साजरा करण्यात आला.

आपण केलेले सुंदर काम आयुष्याच्या शेवटी आपल्याला आनंद देते,तुमचे सार्वजनिक जीवनातील काम प्रशंसनीय आहे, असे आमदार महेश बालदी रितू ठोंबरे यांचा गौरव करताना म्हणाले.

आपल्या विकास कामांसाठी देखील निधी कमी पडणार नाही, याचे आश्वासन यावेळी आमदार बालदी यांनी दिले. कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, नव निर्वाचित पंचायत समिती सदस्य कृष्णा पारंगे, गौरी गडगे, महादेव गडगे, विनोद भोईर, उप सरपंच पूजा हातमोडे, जगदीश हातमोडे, सुनील गायकवाड, ग्राम पंचायत सदस्य, ग्राम पंचायत अधिकारी गणेश मोरे, गणेश कदम, सागर ओसवाल, राजन गावडे, निखिल मालुसरे, गिरीश जोशी, वृषाली पोळेकर, पूनम चोगले यांच्या सह पंचक्रोशीतील शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# रायगडचे आचार्यकुल सतीश धारप

दक्षिण रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस तथा रायगड लोकसभा निवडणूक प्रमुख सतीश धारप यांचा रविवार, दिनांक ८ मार्च रोजी ६०वा वाढदिवस. त्यानिमित्त हा लेखप्रपंच...

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी संपूर्ण सृष्टी ही चैतन्याची आनंदमय अभिव्यक्ती आहे हे आपल्या चिद्विलासवादामध्ये मांडले. विश्वात्मक देवाच्या भक्तीतून मुक्तीचा मार्ग दाखवताना त्यांनी नामामृताचे सुगम साधन सांगताना त्यांच्या हरिपाठात 'सर्वांघटीं राम देहांदेही एक, सूर्यप्रकाशच सहत्ररश्मी' हे स्पष्ट केले. देव रोकडा सज्जनीं म्हणणाऱ्या या संतांच्या महाराष्ट्र भूमीत मानवसेवा हीच ईश्वरसेवा मानणारी जीवनचरित्रे पहायला मिळतात, त्यातीलच एक म्हणजे रायगड जिल्ह्यातील सतीश धारप हे होय. श्री क्षेत्र बल्लाळेश्वर पाली हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आजोबा वेदमहर्षी नारायण धारप यांनी त्यांची जागा बल्लाळेश्वराच्या भक्तनिवासाला दान देऊन दातृत्वाचे आणि समाजसेवेचा आदर्श धारप कुटुंबियांना घालून दिला. याच वाटेवर हे धारप कुटुंबीय अव्याहत चालत आहेत. जिल्ह्यातील राजकारण आणि पत्रकारिता ही दोन्ही क्षेत्र प्रामुख्याने छंद म्हणून व्यापून टाकलेले धारपसाहेब त्यासाठी लागणारा पैसा उभा करण्यासाठी ठेकेदारी व्यवसाय नेटाने करतात.



'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे, उदास विचारे वेच करी' ही संत शिकवण आचरणात आणत ते सढळ हस्ते यथाशक्ती अनेकांना मदत करत असतात. रायगड जिल्ह्यातील तरुणांनी मुंबईत जाऊन कुठेतरी राहून नोकरी करण्यापेक्षा जिल्ह्यात पडेल ते काम करावे त्यासाठी जिल्ह्यातील कंपन्यांनी भूमिपुत्रांनाच प्राधान्याने घ्यावे हा त्यांचा आग्रह तसेच व्यवसायात त्यांनी पुढे यावे म्हणून आर्थिक मदत देणारा पहिला हात त्यांचाच असतो. अलिबाग भाजप तालुकाध्यक्ष म्हणून त्यांच्यावर १९९० साली जबाबदारी देण्यात आली. अलिबागमध्ये भाजप अस्तित्वासाठी झगडत होता तो हा काळ. मोजक्या कार्यकर्त्यांसह त्यांनी केलेला रास्ता रोको हे भाजपचे येथील पहिले जाहीर आंदोलन, पण त्या आंदोलनाची दखल प्रसारमाध्यमांनी तत्कालीन शेकापच्या प्रभावामुळे घेतली नाही. त्यामुळे मीडियाच्या सातबारावर आपलेसुद्धा कुठेतरी नाव हवे अशी पक्की खुणगाठ त्यांनी मनाशी बांधली. यातूनच अगोदर कुलाबा दर्पण आणि नंतर विश्वरूप ही दैनिक वृत्तपत्रे त्यांनी चालविली. त्यांची पत्रकारिता जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय, कला, क्रीडा, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरी कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी राहिली.

धारपसाहेबांना जे ओळखतात त्यांना त्यांच्या शारीरिक व्याधीबद्दल माहिती आहे. त्याबाबत जाहीर वाच्यता न करता केवळ एवढेच सांगता येईल की ज्या स्थितीत लोक गतप्राण होऊन परावलंबी होतात त्या स्थितीत धारपसाहेब अनेकांचे केवळ प्रेरणास्त्रोत न राहता आश्रयदातेसुद्धा होतात. याची प्रचिती कोकणातील अनेक लोकांना आहे. त्याचे गमक काय शोधण्याचा प्रयत्न केला असता एक गोष्ट समोर येते ती म्हणजे त्यांची गणेशभक्ती आणि त्यामार्गावर त्यांच्याकडून होणारी सद्‌गुरूसेवा. सर्वकाही देतो याची प्रचिती त्यांना आली.

या प्रवासात त्यांना समर्थ साथ लाभतेय ती त्यांच्या धर्मपत्नी रोहिणी धारप आणि सुविद्य चिरंजीव अथर्व धारप यांची. माऊलींच्या भावार्थदीपिकेचा हिंदी अनुवाद तसेच संत कबीरांच्या दोह्यांचे संस्कृत अनुवाद करणाऱ्या सुनंदा देवस्थळी यांच्या कुलीन घराण्यातील असलेल्या रोहिणीताई यांचा स्वभाव रोखठोक असला तरी त्या कमालीच्या प्रेमळसुद्धा आहेत. धार्मिक कार्यात कर्मठता, उत्कृष्टेचा ध्यास, तंतोतंत नियोजन, व्यवहारवाद हा ब्राम्हण समाजाचा स्थायीभावच. मुळात त्या कऱ्हाडी ब्राम्हण असल्याने रूचकर भोजन या विषयात त्यांचा हात कोणी धरत नाही. त्यांचं पूर्वी पुण्यात असलेलं चटक मटक आणि आता नवी मुंबई वाशीतील हॉटेल अच्छे दिन यात हे दिसून येते. धारप परिवार चालवत असलेल्या विश्वरूप प्रतिष्ठानच्या अध्यक्षसुद्धा रोहिणीताई याच आहेत. उभयतांच्या मार्गदर्शनाखाली अनेकांची आयुष्ये प्रतिष्ठान प्रकाशमान करत आहे.

धारपसाहेबांचा पिंड कलाकारचा. त्यांनी इयत्ता पाहिलीत असताना सांदिपानी ऋषींची भूमिका केली होती. दहावीत असताना 'नटसम्राट' केले. ठेकेदार झाल्यावर आईशप्पथ नावाचा चित्रपट केला होता. धारपसाहेब यांना भेटायला आलेले लोक त्यांना या अवस्थेतही आनंदित पाहून अचंबित होतात. आत्मसाक्षात्कारामुळे दुःखातसुद्धा सुखी राहणे यालाच तर ज्ञानेश्वर माऊली हरिपाठात म्हणतात, हरिजप करणे, तुटेल धरणे प्रपंचांचे.



रायगड जिल्हा परिषदेत भाजपचा अध्यक्ष बसणार असून धारपसाहेबांचे एक स्वप्न पूर्णत्वास येत आहे. रायगड जिल्ह्यातील काँग्रेस आणि शेकापची पीछेहाट आणि भाजपची घोडदौड यामध्ये चाणक्याची भूमिका धारपसाहेबांची आहे हे सर्वजण मान्य करतात. त्यांच्या धारपनीतीचे चाहते सर्व पक्षात असून त्यांना रायगडचे आचार्यकुल म्हटले तर वावगे ठरणार नाही.

धारपसाहेबांचे पुण्यात चटक मटक नावाचे हॉटेल होते. साहेब मुंबईला शिफ्ट होताना ते बंद पडले. कालांतराने नवी मुंबईतील वाशी येथे हॉटेल अच्छे दिन नावाने उभयतांनी महाराष्ट्रीयन व्यंजनांचे हॉटेल सुरू केले आहे. तेथे त्यांच्या हाताखाली अनेक कुक घडत गेले. अनेक मंत्र्यांच्या घरी असणारे कुक एकतर त्यांनी पाठवलेले असायचे किंवा त्यांचे मार्गदर्शन लाभलेले असायचे. अलिबाग येथील त्यांच्या घरी जी उत्तम भोजनाची मेजवानी अनेक लोकप्रतिनिधी यांच्या मनात घर करून आहे ती धारपसाहेबांच्या पाक कलेचाच एक परिपाक म्हणायचा. त्यांच्याच शब्दात सांगायचे झाले तर प्रत्येकाच्या शरीरात ईश्वर आहे. आपण जेवतो म्हणजे त्यालाच ते देत असतो. आपली परिस्थिती बेताची असेल तर कमी द्यावे, पण उत्तमच द्यावे, कारण आपला आहार उत्तम असेल तर आपले विचारही उत्तम होत जातात. अशा माणसाच्या मनातील हा भाव ओळखून देवसुद्धा काही कमी पडू देत नाही. माणसाने प्रत्येक गोष्ट घसघशीत आणि रसरशीत करावी.

धारपसाहेबांनी त्यांच्या विश्वरूप प्रतिष्ठानमार्फत कोलाड नाक्यावर एक डायलिसीस सेंटर सुरू केले. तेथे मुंबईतील उत्तम वैद्यकीय दर्जाची सेवा मिळेल याची काळजी घेतली. केवळ १००० रुपयात ना नफा ना तोटा तत्वावर येथे डायलिसीस केले जाते. काही वर्षांनी त्यांनी स्वतःच्या नावावर अलिबाग येथेही एक डायलिसीस सेंटर सुरू करून ते कमळ नागरी सहकारी पतसंस्थेला चालवायला दिले. येथेही हजार रुपयात सेवा दिली जाते.

रायगडमधील एका मोठ्या नेत्याने एकदा विचारले, धारपसाहेबांचे एका शब्दात वर्णन करायचे झाले तर काय सांगशील? मी असमर्थ ठरलो होतो आणि आजही एका शब्दात किंवा एका वाक्यात काही जीवनचरित्रे वर्णन करता येत नाहीत हेच खरे..!

**-बाबुराव खेडेकर**
**(स्वीय सहाय्यक आणि मुक्त पत्रकार)**

## जिल्ह्यात १४ मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदालतचे आयोजन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशावरून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये दि.१४ मार्च २०२६ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले असून या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग राजेंद्र द. सावंत यांनी केले आहे.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील सर्व न्यायालयात प्रलंबित असलेली दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी अपिले, मोटार अपघात प्रकरणे, विवाह विषयक प्रलवित प्रकरणे तसेच ग्रामपंचायत यांच्याकडील घरपट्टी, पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबत वादपूर्व प्रकरणे, भारत दूरसंचार निगम लिमिटेड, विजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर वित्तीय संस्था यांच्याकडील थकबाकीबाबत वादपूर्व प्रकरणे सदर लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येतात.

लोकअदालतीचे फायदे पक्षकारांना कोणत्याही प्रकारची फी भरावी लागणार नाही. लोकन्यायालयाच्या निवाडयाविरूध्द अपील नाही. न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणे लोकन्यायालयात होणाऱ्या निवाडयाची अंमलबजावणी न्यायालयामार्फत करता येते. खटल्यांमध्ये साक्षी-पुरावा, उलटतपासणी, दिर्घ युक्तिवाद या बाबी टाळल्या जातात. लोकन्यायालयात निकाली निघणाऱ्या प्रकरणामध्ये कायद्यानूसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते व निर्णय अंतिम व बंधनकारक असतो. लोक अदालतीमध्ये प्रकरण निकाली निघाल्यास वेळ, पैसा व श्रम यांची मोठ्या प्रमाणात बचत होते.

यापूर्वी मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१३ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये प्रलंवित ५ हजार १६९ आणि वादपूर्व १२ हजार ७५१ असे एकूण १७ हजार ९२० एवढी प्रकरणे निकाली निघाली आहेत. यामुळे रायगड जिल्ह्यातील संपूर्ण नागरिकांना फायदा झाला आहे. नागरीकांना ही संधी पुन्हा मिळणार आहे.

## टॉवरच्या बॅटरी चोरणाऱ्यास अटक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

घोडिवली गावाच्या हद्दीत अंजरुण फाटा येथील ईन्डस कंपनीच्या एअरटेल टॉवरच्या बॉक्समधील असलेल्या अमरराजा कंपनीच्या एकूण ३८ बॅटरी अंदाजे किंमत २४,७०० रुपयांचा माल चोरीला गेल्याची खालापूर तालुका पोलिस ठाण्यात नोंद झाली होती.

या गुन्ह्यांची खालापूर तालुका पोलिस आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने समांतर तपास करीत घटनास्थळाचा परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. फुटेजमधील संशयित वाहनाचे तसेच आरोपीचा गोपनीय बातमी दारामार्फत शोध घेवून तिघा आरोपींना ताब्यात घेतले.यात अविनाश मनोहर चव्हाण (वय २६), रोहित मनोहर चव्हाण (वय २५) दोघेही राहणार उल्हासनगर,विजय सुरेश चव्हाण (वय २६) राहणार खालापूर यांना ताब्यात घेऊन टाटा कंपनीचा टेम्पो अंदाजे किंमत ७ लाख पोलिसांनी हस्तगत केला आहे.याप्रकरणी खालापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**ड्रायव्हर पाहिजे**

**फॉर्च्युनर कार साठी ड्रायव्हर पाहिजे**

१०२, सी-विंग, साक्षी पार्क-२, शिलोत्तर रायचूर, सुकापूर, नवीन पनवेल, जिल्हा रायगड (महाराष्ट्र)

माऊली एंटरप्रायजेस, जेएनपीटी, जासई-४१०२०६

**संपर्क**
**मोबाईल : ८९०८४००२१४**
Email : ekanathpatil4141@gmail.com


**दि पनवेल को-ऑप.अर्बन बँक लि. पनवेल**
४७१, कापड बाजार, टिळक रोड, पनवेल - ४१० २०६, जि. रायगड
ईमेल आयडी - panvel_urban65@rediffmail.com /panvelurban0065@gmail.com

**परिशिष्ट IV**

**ताबा सूचना**
[नियम-८(१)]
(स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी,
निम्नस्वाक्षरीकार यांनी, **दि पनवेल को-ऑप.अर्बन बँक लि.,** चे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (५४/२००२) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अमंलबजावणी) नियमन २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून **दि. १२.११.२०२४** रोजी मागणी सूचना जारी करून कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार **श्री. निवृत्ती लक्ष्मण कोळी, श्रीमती शालाका निवृत्ती कोळी, श्री. राज एकनाथ कोळी, श्री. दिपक बंदू कोळी आणि श्री. निलेश अरुण खाडे** यांच्याकडे सूचनेमध्ये उल्लेख केलेली **दि. ३१.१०.२०२४** रोजीनुसारची रक्कम **रु.२५,७९,०६७/- (रुपये पंचवीस लाख एकोणऐंशी हजार सदुसष्ठ फक्त )** व **दि. ०१.११.२०२४** पासून संपूर्ण परतावापर्यंतचे पुढील व्याज परतावा करण्याची मागणी केली होती.

कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार रकमेचा परतावा करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सूचना देण्यात येते की, याखाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा निम्नस्वाक्षरीकार यांनी सदर नियमन, २००२ च्या नियम ८ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३ (४) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून **दिनांक ०६ मार्च, २०२६** रोजी **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.

विशेषत: वरील उल्लेखित कर्जदार / गहाणवटदार / जामीनदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे खबरदार करण्यात येते की, सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करूनये आणि या मालमत्तेबाबतचा कोणताही व्यवहार हा **दि पनवेल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., कापड बाजार शाखेच्या** रक्कम **रु.२५,७९,०६७/- (रुपये पंचवीस लाख एकोणऐंशी हजार सदुसष्ठ फक्त )** आणि त्यावरील व्याजाच्या प्रभारास अधीन असेल.

**तारण मालमत्ता सोडविण्याकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम (१३) च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदार / जामीनदार / गहाणवटदार यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.**

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

श्री. निवृत्ती लक्ष्मण कोळी आणि श्रीमती शालाका निवृत्ती कोळी यांच्या नावे असलेले घर क्र. २०९४, ८४१ चौ. फूट, गाव गव्हाण, तालुका पनवेल, जि. रायगड,

**ठिकाण: पनवेल गव्हाण**
**दिनांक : ०६.०३.२०२६**

सही/-
प्राधिकृत अधिकारी
दि पनवेल को-ऑप अर्बन बँक लि.



# लक्षवेधी मराठी सिनेतारका

झूम प्रहर
दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक



मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासात अनेक नायिका लक्षवेधक ठरल्या. त्यातीलच काही नायिकावर हा ८ मार्च या महिला दिनानिमित्त विशेष फोकस....

काही नायिकांच्या अतिशय लोकप्रिय भूमिकांची मुळे फ्लॅशबॅकमध्ये जात पाहिलं तर नेमकी कुठे असतील हे सांगता येत नाही हेच खरे. नायिका या गोष्टीतील हा फंडा अगदीच वेगळा. शांता आपटे या महाराष्ट्रीय नायिकेची वाटचाल काळाच्या खूपच पुढची होती. आज एका भाषेतील कलाकार अन्य भाषेतील चित्रपटात व्यावसायिक रणनीतीनुसार भूमिका साकारतात. शांता आपटे या चाळीसच्या दशकातच मराठीतून हिंदीत गेल्या. विशेष उल्लेखनीय गोष्ट मराठी चित्रपटातून हिंदीत गेलेल्या त्या पहिल्याच अभिनेत्री आहेत. आणि त्यात त्यांनी चक्क कोलकाता (तेव्हाचे कलकत्ता) येथे जाऊन स्वयंसिद्धा या चित्रपटात शीर्षक भूमिका साकारली. १९४९ सालची ही गोष्ट. ही भूमिका अशी व इतकी लोकप्रिय झाली की त्यानंतर १९६१ साली माला सिन्हाने बहुरानी या चित्रपटात, हेमा मालिनीने १९८१ साली ज्योती या चित्रपटात आणि १९९२ साली माधुरी दीक्षितने बेटा या चित्रपटात तीच व्यक्तिरेखा साकारलीय. या सगळ्यात पहिल्यांदा भूमिका साकारली ती शांता आपटे यांनी आणि एका नायिकेच्या भूमिकेचा प्रवास असा सुरू राहिला.

दोन्ही नायिकांचे प्रत्यक्षातील वय एकसारखेच आहे, पण एखाद्या चित्रपटात एका नायिकेने दुसऱ्या नायिकेच्या चक्क आईची भूमिका साकारलीय असेही घडलयं. नायिका नायिका यात ही गोष्ट काही वेगळीच. दादासाहेब फाळके दिग्दर्शित गंगावतरण या १९३७ सालच्या चित्रपटाच्या वेळेस तसे घडले. शांता हुबळीकर यांचा हा पहिलाच चित्रपट. या चित्रपटाच्या वेळेस त्यांचे वय होते अवघे पंधरा आणि याच वयात त्यांनी या चित्रपटात त्यांच्याच वयाच्या असलेल्या लीला चंद्रगिरी यांच्या आईची भूमिका साकारलीय. त्या काळात कसलेही आढेवेढे न घेता अनेक कलाकार चित्रपटातून भूमिका साकारत. नायिका गोष्टीत काही एकदम वेगळेच.

ही गोष्ट १९३० सालची. दिग्दर्शक एम. भवनानी यांनी फरेबी जाल हा दोन नायिका असलेला चित्रपट निर्माण करण्याचे पाऊल टाकले. या चित्रपटातील एक नायिका म्हणून आपली पत्नी इनाक्षी रामाराव यांची निवड केली. त्या एम. ए.ची पदवी प्राप्त होत्या. त्या काळात पदवीधर ही सामाजिकदृष्ट्या खूपच मोठी गोष्ट. आता त्यांच्यासोबतची दुसरी नायिकादेखिल तशीच सुशिक्षित हवी असे एम. भवनानी यांना वाटले. त्यांनी त्यासाठी दुर्गा खोटे यांच्या मोठ्या बहिणीची निवड करण्याचे ठरवले, पण त्यांना नाटकात, मूकपटात रस नव्हता म्हणून त्यांनी दुर्गा खोटे यांचे नाव सुचवले. दुर्गा खोटे यांनी होकार दिला आणि या दोन नायिका असलेल्या मूकपटाचे चित्रीकरण सुरू झाले आणि हा चित्रपट पूर्ण व्हायच्या आतच आपल्याकडील चित्रपट बोलू लागला. आता काय करायचे? तर त्यानंतरचे चित्रीकरण बोलक्या दृश्यांचे करण्यात आले. त्यामुळेच हा चित्रपट पाहताना अधूनमधून तो बोलू लागे. त्या काळात ते मनोरंजक ठरले. या चित्रपटात दुर्गा खोटे यांनी सहज औपचारिकता म्हणून काम केले होते, पण आता त्यांनी याच क्षेत्रात करिअर करायचे ठरवले.

दिग्दर्शक एम. भवनानी हे दोन नायिका असलेल्या चित्रपटाच्या कथा रुपेरी पडद्यावर आणत आणि त्यात एक नायिका त्यांची पत्नी इनाक्षी रामाराव या साकारत. त्या एमए पदवीधारक होत्या. १९३१ साली एम. भवनानी यांनी वसंतसेना या चित्रपटाची निर्मिती करताना त्यात दुसरी नायिका म्हणून नलिनी तर्खडं यांची निवड केली. त्या बीए पदवीधारक होत्या. विशेष उल्लेखनीय गोष्ट, या चित्रपटाच्या जाहिरातीत या दोन्ही नायिकांच्या पदवीचा आवर्जून उल्लेख केला जाई.





एकाच वेळेस मराठी व हिंदी भाषेत चित्रपट निर्माण करण्याची पद्धत खूपच जुनी. चित्रपती व्ही.शांताराम दिग्दर्शित असे काही चित्रपट चाळीसच्या दशकातच रुपेरी पडद्यावर आले. त्यांचा एक चित्रपट होता, शेजारी. साल १९४१. हा चित्रपट त्यांनी मराठीत शेजारी व हिंदीत पडोसी या नावाने दिग्दर्शित केला. शेजारी या चित्रपटात जयश्री (कामुलकर) या नायिका होत्या आणि या चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या काळातच व्ही. शांताराम व जयश्री यांचे नातेसंबंध दृढ झाले आणि त्यांनी विवाह केला, पण जयश्री या महाराष्ट्रीय कुटुंबात वाढल्याने त्यांना हिंदीत बोलणे कितपत जमेल अशी प्रभात फिल्म कंपनीत काहींनी शंका व्यक्त केल्याने 'पडोसी'ची नायिका म्हणून अनिस खातूनची निवड केली. एक गोष्ट, दोन भाषेतील चित्रपट पण दोन भिन्न नायिका असे झाले. तसे असले तरी शेजारी या चित्रपटात त्यांनी साकारलेले लख लख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया हे गाणे आजही लोकप्रिय आहे. व्ही.शांताराम यांचा हा प्रभात चित्रमधील शेवटचा चित्रपट. त्यानंतर त्यांनी राजकमल कलामंदिरची स्थापना केली. हे नायिका नायिका प्रकरण वा उदाहरण अगदीच वेगळे.

मा. विनायक अभिनित व दिग्दर्शित ब्रह्मचारी या १९३८च्या चित्रपटापासून त्यांची व नायिका मीनाक्षी शिरोडकर यांची रुपेरी पडद्यावर जोडी जमली. त्यानंतर मा. विनायक यांच्या ब्रॅन्डीची बाटली, देवता, अर्धांगी, अमृत, माझं बाळ, गजाभाऊ या चित्रपटात मीनाक्षी शिरोडकर नायिका होत्या. त्या काळात खूपच एकोप्याने चित्रपट निर्मिती होत असे आणि त्यात नातेसंबंध दृढ होत, पण ते किती व्हावेत? पहिली मंगळागौर या चित्रपटाचे दिग्दर्शन मा. विनायक करीत होते आणि स्नेहप्रभा प्रधान या चित्रपटात नायिका होत्या. स्नेहप्रभा प्रधान यांनी एखादे दृश्य दिल्यावर मा. विनायक त्यांना हे दृश्य मीनाक्षी शिरोडकर यांनी कसे दिले असते हे सांगत. हे सतत होत राहिले आणि मग मा. विनायक यांनीच निर्णय घेऊन आणि या चित्रपटाचे दिग्दर्शन सोडले. आणि मग र.शं. जुन्नरकर यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला. विशेष उल्लेखनीय गोष्ट, या चित्रपटात लता मंगेशकर यांनी मराठी चित्रपटासाठी गायलेल्या पहिल्या गाण्याचा नटली चैत्राची नवलाई या गाण्याचा समावेश आहे. पडद्यावरही लता मंगेशकर यांनीच हे गाणे साकारलयं. त्यांची भूमिका छोटीशीच आहे.१९४२ सालची ही गोष्ट.

मा. विनायक आणि मीनाक्षी शिरोडकर ही नायक नायिका जोडी अन्य दिग्दर्शकांच्या चित्रपटातही होती. त्यात एक चित्रपट होता, आचार्य अत्रे यांच्या नवयुग पिक्चर्स निर्मिती व नारायण काळे दिग्दर्शित लपंडाव ( १९४०) आणि या चित्रपटात मीनाक्षी शिरोडकर व वनमाला अशा दोन नायिका होत्या, पण गंमत अशी की, ब्रह्मचारी चित्रपटाच्या यशानंतर महाराष्ट्रीय कुटुंबात मुलीचे नाव मीनाक्षी असे ठेवण्याचे युग आले. हे नाव इतके लोकप्रिय झाले की कोलकत्याच्या न्यू थिएटर्स या चित्रपट निर्मिती संस्थेने आपल्या एका चित्रपटाचे नाव मीनाक्षी असे ठेवले. ब्रह्मचारी चित्रपट १९३८ साली पडद्यावर आला तर मीनाक्षी चित्रपट १९४२ साली. असा हा नावाचा प्रभाव होता. या चित्रपटात नायिका साधना बोस हिचे नाव मीनाक्षी असते. लपंडाव चित्रपटात मीनाक्षी शिरोडकर यांच्यासोबतच दुसरी नायिका असलेल्या वनमाला यांचा हा पहिलाच चित्रपट. यात पुन्हा आणखी एक गंमत आहे, मीनाक्षी शिरोडकर यांचे मूळ नाव रतन. हंस पिक्चर्सने ते त्यांना दिले तर वनमाला यांचे खरे नाव सुशीला. विशेष उल्लेखनीय गोष्ट आचार्य अत्रे पुण्यातील आगरकर हायस्कूलमध्ये प्राध्यापक असतानाच त्यांना सुशीला यांच्यात अभिनेत्री होण्याचे गुण ओळखले. लपंडाव या चित्रपटाची कथा लिहीत असतानाच त्यांच्या लक्षात आले होते मा. विनायक या चित्रपटाचे नायक असल्याने मीनाक्षी शिरोडकर यात एक नायिका निश्चित असणार. दुसरी नायिका महाविद्यालयात जाणारी दाखवलीय ती सुशीला अर्थात वनमाला असावी हे अत्रे यांनीच मा. विनायक यांना सुचवले आणि अशा पद्धतीने एका चित्रपटात दोन नायिका एकत्र आल्या. त्या निवडीमागची कारणे आवडीनिवडीत आहेत असे म्हणायचे काय? नाते आई व मुलीचे असले तरी मनोरंजन क्षेत्रात त्या दोन नायिकाच. आई नायिका असल्यानेच मुलीला चांगल्या टीप्स आपोआपच मिळतात. आणि तीदेखील नायिका म्हणून वावरताना काळजी घेतेच.

शुभांगी गोखले यांची लेक सखी गोखले ही एक अशीच परिचित जोडी. सखी विविध मुद्द्यांवर आपलं परखड मत मांडत असते. सखीने आपल्या आईच्या स्वभावाविषयी एका मुलाखतीत भाष्य केलं.. माझ्याकडून काही मोठ्या चुका केल्या. तेव्हा त्याचा मला पश्चाताप नाही झाला. या चुकांवेळी माझी आई माझी मैत्रीण झाली. तिने त्या चुकांवर रागावली नाही, असं सखीने सांगितलं. जेव्हा अशा मोठ्या चुका झाल्या तेव्हा मला भीती वाटायची की आई मला रागवेल. ती खूप ओरडेल, पण अशा वेळी आईने खूप समजुतीने घेतलं. मला समजून घेतलं, असं सखीने म्हटलं. माझ्या मोठ्या चुकांवेळी आई ही माझी मैत्रिण झाली. जेव्हा मला वाटलं की मोठी चूक झालीय. यातून आता सुटका नाही, अशावेळी तिने मैत्रिणीची भूमिका घेतली. आईपेक्षा ती माझी मैत्रिण झाली, असं सखी म्हणाली. जेव्हा मी लहान-सहान चुका करते. तेव्हा मात्र आई खूप रागावते. मला एखाद्या ठिकाणी पोहचायला उशीर झाला. तर मग ती मला रागावते, असं सखीने म्हटलंय.या जोडीच्या नात्यातील हे काही पैलू. आई आणि मुलगी अशा अनेक जोड्या मनोरंजन क्षेत्रात आहेत. त्यांच्याभोवती विशेष वलयही आहे. अशीच एक जोडी सुप्रिया पिळगावकर व श्रिया पिळगावकर.

आईच्या प्रेमाला तोड नसते. आईला प्रत्येक टप्प्यावर मुलांसोबत तडजोड करावी लागते. मुल जन्माला आल्यावर, मुलं मोठी होताना, मुलं शिक्षण आणि नोकरीसाठी घराबाहेर पडतात तेव्हा, मुला-मुलींचे लग्न झाल्यावर, मुलांना मुलं झाल्यावर अशा अनेक टप्प्यावर आईची भूमिका नेहमीच बदलत जाते. अशीच एक आई रिअल आणि रिल आयुष्यात तिची भूमिका खंबीरपणे साकारताना दिसते सुप्रिया पिळगावकर. पडद्यावर आई साकारताना आणि खऱ्या आयुष्यात आईची भूमिका साकारताना कशी आहे सुप्रिया पिळगावकर आणि नायिका म्हणून त्या कसा विचार करतात आणि आपली मुलगी श्रीया हिचा मुलगी म्हणून व एक नायिका म्हणून कसा विचार करतात? कुछ रंग प्यार के ऐसे भी नई कहानी या मालिकेत सुप्रिया पिळगावकरनी आईची भूमिका साकारली. यातील ईश्वरी ही महिला वेगळ्या छटा असलेली आई आहे.

सुप्रिया पिळगावकर म्हणजे ईश्वरी सांगतात, एक आई म्हणून ईश्वरी आपल्या मुलांवर सारखेच प्रेम करते, पण आपणा सर्वांना माहीतच आहे की, देव (शहीर शेख)कडे तिचा विशेष कल आहे. आपल्या आणि आपल्या मुलाच्या नात्यात ती कोणालाच येऊ देत नाही. माझ्या मते, प्रेम आणि काळजी दाखवण्याची प्रत्येक आईची आपली खास पद्धत असते. शेवटी एका आईची इच्छा आपल्या मुलाने आनंदात असावे आणि जीवनात त्याची भरभराट व्हावी हीच तर असते. देवबद्दल ईश्वरीला हेच वाटत असते, तर श्रेयाची आई म्हणजेच खऱ्या खुऱ्या आयुष्यातील आईपणाबद्दल सुप्रिया पिळगावकर यांनी शेअर केलं, मला एक मुलगी आहे आणि तिने आई म्हणून माझी निवड केली याबद्दल मला कृतज्ञता वाटते. तिच्या बाबतीत मी खूप प्रोटेक्टिव्ह आहे. तिच्या वास्तव व व्यावसायिक जीवनात ती जे निर्णय घेते, त्यात मी तिच्यावर विश्वास ठेवते आणि तिला आधार देते. ती एक सुंदर आणि स्वतंत्र स्त्री झालेली पाहताना माझ्या मनाला खूप आनंद होतो. आपल्याला हे माहीत असते की एक ना एक दिवस आपली मुले पाखरासारखी घरट्यातून उडून जाणार आहेत, पण तरीही एका आईसाठी ती मुले नेहमीच जीवाभावाची राहतात. **(उत्तरार्ध उद्याच्या अंकात)**

# उद्योजिका तथा सामाजिक कार्यकर्त्या रेखा बेलोसे



आज ८ मार्च महिला दिन स्त्री शक्तीचा गौरव करणारा आणि तिला समानतेचे स्थान मिळवून देण्यासाठी प्रेरित करणारा हा दिवस असून या महिला दिनाच्या निमित्ताने प्रत्येक महिलेला हार्दिक शुभेच्छा आणि तिच्या कार्याला सलाम.

माथेरान मधील हॉटेल द कृष्णाच्या मालक रेखा बेलोसे या एक उत्तम उद्योजिका असून शहरातील सर्व सामाजिक कार्यक्रमात हिरहिरीने सहभागी होत असून आपल्या मैत्री प्रतिष्ठान ग्रुपच्या माध्यमातून माथेरान शहरात अनेक सामाजिक उपक्रम देखील येथे राबवित असतात.या मध्ये असवाष्ण महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रम, ज्येष्ठ नागरिकांसाठी पेन्शन योजना, क्रिकेट सामन्यांसाठी तरुणांना प्रोत्साहित करून आर्थिक मदत अश्या विविध माध्यमातून त्यांचा सामाजिक उपक्रम सुरू असतो. स्वतः जवळ कोणतेही राजकीय पद, समित्या, संस्था यांचे अध्यक्ष पद नसताना निव्वळ स्वतः च्या हिमतीवर अनेक सामाजिक उपक्रमात त्या नेहमी अग्रेसर असतात. पुरुष प्रधान समाज व्यवस्थे मध्ये नेहमी स्त्रियांना दुय्यम स्थान देण्याची सर्वत्र मानसिकता असताना स्त्रियांना, तरुण मुलींना एकत्रित करून धार्मिक कार्यक्रमांमध्ये देखील रेखा बेलोसे नेहमी अग्रेसर असतात. माथेरानमधील एक अश्व चालकाची मुलगी ते एक उत्तम उद्योजिका असा त्यांचा खडतर व आयुष्यातील अनेक समस्यांमधून अनेक उतार चढाव असणारा प्रवास सर्वांनाच थक्क करणारा आहे. माथेरानमधील अश्वचालकाची मुलगी असूनदेखील माथेरानमध्ये ई-रिक्षा सुरू व्हाव्यात व कायद्याच्या कक्षेत राहून चालवाव्यात याबाबत सुद्धा त्यांनी ई-रिक्षाला समर्थन दिले तसेच अश्व हे माथेरान पर्यटनस्थळाची शान असून त्यांच्या व्यवसायावर पण कसलेही संकट येऊ नये म्हणून अश्व चालकांसोबतदेखील त्या नेहमी ठामपणे उभ्या असतात. यंदाच्या वर्षी तर माथेरान मध्ये अशी कोणताही क्रिकेट स्पर्धा झाला नाही की ज्या क्रिकेट स्पर्धेला रेखा बेलोसे यांनी मदतीचा हात दिला नाही. माथेरानमधील या वर्षीच्या प्रत्येक क्रिकेट स्पर्धेला रेखा बेलोसे भरभरून प्रतिसाद देत स्पर्धा यशस्वी केली.

■ **संतोष खाडे, माथेरान**

# गरीब दुबळ्यांना आपल्याशा वाटणाऱ्या मनीषा सुर्वे



पूर्वाश्रमीची मनीषा पांडुरंग देशमुख आणि आता मनीषा मुकेश सुर्वे. मनीषा गेली पंचवीस-तीस वर्ष गरीब व गरजुंना मदत करीत आहेत. नेहमीच वृद्धाश्रमांमध्ये जाऊन तेथील जेष्ठ नागरिकांची विचारपूस करून त्यांना काय हवे? काय नको? याची माहिती घेऊन त्यांना मदत करणे. आदिवासी शाळांमध्ये जाऊन आदिवासी मुला-मुलींना पुस्तके, दप्तर, खाऊ देणारी अशा अनेक कामांबरोबरच गेल्या साडे तीन वर्षांपासून प्रतिष्ठानच्या माध्यमातून मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिरांचे आयोजन करून सुमारे पंधरा हजारच्या वर रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देऊन त्यांची व्याधिंपासून सुटका करून देण्याचा प्रयत्न करणारी समाजसेविका म्हणून ओळखली जाते. महाविद्यालयापासूनच मनीषाने सेवाव्रत स्वीकारले होते. आपल्याकडे आहे मात्र आपल्या मैत्रिणींकडे नाही. याबद्दल तीला नेहमीच वाईट वाटत असे. सतत तिचा हात देण्याचा प्रयत्न असायचा. प्रसंगी आपल्या कडील काही चीज वस्तू त्यावेळी ती आपल्यापेक्षा गरजू असलेल्या मैत्रिणींना द्यायची. या स्वभावामुळे ती मैत्रिणींमध्ये आवडती होती. त्यांनी एमए ची पदवी प्राप्त केली. महाविद्यालयीन शिक्षण झाल्या नंतर कर्जतचे माजी आमदार स्व. तुकाराम सुर्वे यांचे धाकटे चिरंजीव मुकेश सुर्वे यांच्याशी तिचा विवाह झाला.

विवाहनंतरसुद्धा तिने समाजसेवेचे व्रत सुरूच ठेवले. सासरे माजी आमदार होते. म्हणून सुर्वे कुटुंब तालुक्याला नव्हे तर जिल्ह्याला परिचित होते. त्याचा फायदा मनीषा सुर्वे यांनी घेतला आणि कर्जत तालुकाच नव्हे तर रायगड जिल्ह्यात त्यांनी आपल्या मदतीचा हात सातत्याने पुढे केला. त्या श्री. व सौ. वधूवर मंडळ कर्जतच्या अध्यक्ष आहेत. कृष्णा महिला बचत गटाच्या सदस्य, महिला निराधार केंद्राच्या सचिवपदाची जबाबदारीही सांभाळली आहे. संस्कार भारती समिती कर्जत शाखेच्या त्या खजिनदार होत्या.

विद्या विकास मंदिर शाळा सदस्य, कर्जत महिला मंडळ कमिटी सदस्य, श्री कपालेश्वर मंदिर महिला मंडळ, ज्ञानेश्वरी पारायण व ज्ञानयज्ञ सोहळा समिती, आश्रय ट्रस्ट डोंबिवली, उत्कर्ष इव्हेंन्टस्, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, महिला दक्षता कमिटी कर्जत या संस्थांमध्ये सुद्धा काम केले आहे.

साडे तीन वर्षांपूर्वी माजी आमदार तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानची स्थापना करून या प्रतिष्ठानचे सचिवपद त्या सांभाळत आहेत. कर्जत तालुक्यातील गावो गावी अगदी आदिवासी भागातसुद्धा प्रतिष्ठानच्या माध्यमातून मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिरांचे आयोजन केले आहे. पनवेल, आळंदी, कोकणातील आंगणेवाडी येथे सुद्धा शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. आत्ता पर्यंत ३७ आयुर्वेदिक चिकित्सा शिबिरांचे आयोजन करून सुमारे पंधरा हजार रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे पुरविली आहेत. अजूनही हे कार्य सुरू असून प्रत्येक महिन्याला शिबिराचे आयोजन करण्यात येते. या शिबिरासाठी दादर-मुंबई येथील ज्योवीस आयुर्वेद हॉस्पिटलच्या डॉ. ज्योती सातपुते आणि डॉ. राज सातपुते यांच्या माध्यमातून रुग्णांची तपासणी केली जाते, तर दादर-मुंबईच्या नारी सामाजिक संस्थेच्या माध्यमातून रुग्णांना लागणारी मोफत औषधे पुरविली जातात. मनीषा सुर्वे यांना राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार (नाशिक), लोकमत वृत्त समुहाचा सावित्रीच्या लेकी (रायगड), नवदुर्गा पुरस्कार एन.डी. स्टुडिओ, नवदुर्गा पुरस्कार ज्योविस आयुर्वेद दादर, मैत्री बोध संस्थेकडून सर्वोत्कृष्ट समाजसेविका पुरस्कार मिळालेला आहे.

■ **विजय मांडे, कर्जत**

## एक कर्तव्यदक्ष
# सरपंच रितू ठोंबरे



कर्तव्यदक्ष सरपंच म्हणून ग्रुप ग्रामपंचायत चौकच्या थेट सरपंच म्हणून रितू ठोंबरे यांचे नाव घेतल्यास वावगे ठरणार नाही. आज खालापूर तालुक्यातील सर्वात कमी वयाच्या सरपंच म्हणून त्या आहेत, कॉलेज जीवनात एमबीएचा अभ्यास करताना ग्रुप ग्रामपंचायत चौकच्या निवडणुकीत उडी घेतली, आणि थेट सरपंच पदावर आरुढ झाल्या. वयाने लहान पण कर्तव्य आणि जबाबदारीची जाणीव असलेली व्यक्ती म्हणून शासकीय यंत्रणा ते सामान्य नागरिक त्यांच्याकडे पाहत आहे.

सरपंच पदावर बसल्यावर इरसाल वाडीची दुर्घटना घडली, आणि न थकता त्यांनी शासकीय यंत्रणेबरोबर काम केले.अगदी दुर्घटनाग्रस्त यांना तात्पुरती निवास व्यवस्था ते पक्क्या घरात जाई पर्यंत त्यांनी इरसाल दुर्घटनाग्रस्त यांच्याबरोबर राहिल्या, सरपंच पद म्हणून कारभार न करता वेळ प्रसंगी संगणकावर बसून त्यांनी अहवाल असो किंवा माहिती तयार केली. आजही नव नवीन योजना यांची माहिती घेताना अगर देताना स्वतः संगणक हाताळताना चौक ग्राम पंचायत कार्यालयात दिसतात, त्यांच्या कामाची दखल घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सरपंच रितू ठोंबरे यांचा सन्मान केला. अनेक नवीन योजना राबविण्यात त्या यशस्वी झाल्या आहेत.सांडपाण्याचा पुन्हा वापर करून पाणी पुरवठा योजनेचा भार कमी करण्याचा त्यांचा प्रयोग यशस्वी होताना दिसत आहे.घंटा गाडी वेळेवर फिरते की नाही?कामाच्या ठिकाणी काम होते अगर कसे, अथवा अन्य कामांची माहिती स्वतः गाडीच्या चालक होऊन बघतात.

मुख्यमंत्री समृद्ध ग्राम पंचायत अभियान आणि माझी वसुंधरा अभियानात निसर्गाचा समतोल राखणे आणि पर्यावरण राखणे यासाठी त्यांनी ध्यास घेतला आहे. नुकताच त्यांनी माझी वसुंधरा अभियानात कोकण विभागात प्रथम येऊन पन्नास लाखाचे बक्षीस जिंकले आहे. ग्रामपंचायत हद्दीतील लोकांना स्वच्छ पाणी पुरवठा,रस्ते,लाईट, नागरी सुविधा उपलब्ध करण्यासाठी त्यांचे सातत्य दिसत आहे. लोकोपयोगी अनेक उपक्रमांचा पाठपुरावा आणि ध्यास घेतलेला असून संपूर्ण ग्राम पंचायत टीम यांना बरोबर घेऊन गावाचा विकास करण्यासाठी प्रयत्न करताना दिसत आहे.

चौक हे ऐतिहासिक गाव आहे. त्यामुळे या गावात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभे रहावे यासाठी प्रयत्न करून शिवजयंती तिथी प्रमाणे त्याचे लोकार्पण त्यांनी करून चौक व परिसरातील लोकांना ऐतिहासिक वारसा जपण्याची प्रेरणा दिली.

■ **अर्जुन कदम, चौक**

# सामाजिक कार्यकर्त्या भूमिका सिंह



भूमिका सिंह या लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी आणि द्रोणागिरी फाउंडेशनच्या अध्यक्षा आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून त्या सामाजिक कार्यात सक्रिय असून समाजाच्या उन्नतीसाठी आपला वेळ, ऊर्जा आणि नेतृत्व समर्पितपणे देत आहेत. त्यांच्या कार्यातून समाजाबद्दलची जबाबदारी आणि गरजूंबद्दलची संवेदनशीलता स्पष्टपणे दिसून येते.

त्यांच्या सामाजिक कार्याची सुरुवात कपडे वाटप उपक्रम, बीच स्वच्छता अभियान आणि पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण यांसारख्या साध्या पण अर्थपूर्ण उपक्रमांपासून झाली. हे कार्य हळूहळू व्यापक मानवतावादी चळवळीत रूपांतरित झाले .शिक्षण आणि बालकल्याण हे त्यांच्या कार्याचे प्रमुख क्षेत्र ठरले.

झोपडपट्टीतील मुलांना मोफत शिक्षण देणे, दर रविवारी शैक्षणिक उपक्रम आयोजित करणे, गरजू मुलांना मोफत अन्न वितरण करणे तसेच आर्थिक अडचणीत असलेल्या विद्यार्थ्यांची शाळेची फी भरणे अशा विविध उपक्रमांद्वारे त्यांनी शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांचा ठाम विश्वास आहे की शिक्षण हे गरिबीच्या दुष्टचक्रातून बाहेर पडण्याचे सर्वात प्रभावी साधन आहे.

निराधार व गरजू वृद्धांना आधार देऊन त्यांना वृद्धाश्रमात सन्मानाने स्थायिक करण्याचे कार्य त्यांनी केले आहे. त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांना योग्य काळजी, सन्मान आणि भावनिक आधार मिळावा यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील असतात. आरोग्य क्षेत्रातही त्यांनी विविध मोफत वैद्यकीय शिबिरे आयोजित करून गरजू नागरिकांना आवश्यक आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली आहे.

त्या नियमितपणे NSS सत्रे, नेतृत्व विकास कार्यशाळा आणि प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित करून युवकांना सामाजिक जाणीव, जबाबदारी आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रेरित करतात. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक युवक आणि ज्येष्ठ नागरिक समाजकार्यात सक्रिय सहभागी झाले आहेत.

लायन्स क्लबच्या सहकार्याने त्यांनी विविध क्षेत्रांमध्ये अनेक प्रभावी उपक्रम यशस्वीपणे राबवले आहेत. अलीकडेच त्यांच्या नेतृत्वाखाली ३५०हून अधिक हेल्मेटचे वाटप करून रस्ते सुरक्षिततेबाबत व्यापक जनजागृती करण्यात आली.

सामाजिक सेवेत दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मान प्राप्त झाले आहेत. त्यांचे समर्पण, करुणा आणि नेतृत्वगुण हे समाजात सकारात्मक व दीर्घकालीन बदल घडवण्याच्या त्यांच्या ध्येयाचे प्रतीक आहेत.

■ **विठ्ठल ममताबादे, उरण**

# अमराठी मुलांना मराठीत शिक्षण देण्यासाठी धडपडणाऱ्या सुजाता पाटील

रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या अलिबाग शहरात व शहराच्या आसपास अनेक शाळा आहेत. त्यात अनेक प्रतिथयश संस्थांच्या मोठ्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळा आहेत, मात्र सुधागड एजुकेशन सोसायटीची कुरूळ येथील माध्यमिक शाळा आणि सृजन विद्या प्रसारक मंडळाची मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा या मात्र वेगळ्या प्रयोगशील शाळा आहेत. या शाळांमध्ये कुरूळ आणि आसपासच्या खेडेगावातील गरीब मुले येतातच, पण त्याचबरोबर परप्रांतीय मुलांना मराठीत शिक्षण देण्याचे काम ही शाळा करते.

अलिबाग आणि परिसरात बांधकाम व त्याच्याशी संबंधित व्यावसायिक क्षेत्रातील अनेक मजूर, कामगार देशाच्या विविध राज्यातून, प्रामुख्याने उत्तर भारतातून स्थलांतरित होऊन येतात. या मुलांच्या मातृभाषा विविध आहेत. त्यांना मराठीतून शिकणे सुलभ आणि आनंददायी व्हावे यासाठी ही शाळा प्रयत्नशील असते. या उपक्रमांची, प्रयोगांची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली गेली आहे. अनेक अडचणींवर मात करत ३३ वर्षे ही शाळा सुरू आहे. याचे श्रेय या शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता पाटील यांना आहे.

सुजाता पाटील केवळ मुख्याध्यापिका नाहीत, तर त्या साहित्यिकही आहेत. त्यांचे प्रकाशाचे झाड आणि हुंकार मनाचा हे दोन कविता संग्रह प्रकशित झाले आहेत. विविध कार्यक्रमातून मान्यवर साहित्यिकांच्या मुलाखती त्यांनी घेतल्या आहेत. सुगम व शास्त्रीय संगीताच्या, वाद्य संगीताच्या मैफिलीचे निवेदनदेखील त्या करतात. कवयित्री श्रीमती अरुणा ढेरे, वीणा गवाणकर, कविता महाजन, विश्वास पाटील, प्रज्ञा दया पवार यासारख्या मान्यवर साहित्यिकांच्या मुलाखती त्यांनी घेतल्या आहेत. सुगम व शास्त्रीय संगीताच्या वाद्य संगीताच्या मैफिलीचे निवेदन त्या करतात. पं. उपेंद्र भट, श्रुती सडोलीकर, मृदुला दाढे-जोशी, पं. भवानी शंकर, संगीत मिश्रा, अश्विनी भिडे-देशपांडे अशा अनेक सुप्रसिद्ध गायक-वादकांच्या कार्यक्रमांचे निवेदन त्यांनी केले आहे.

सुजाता पाटील यांनी निवेदन केलेल्या संगीत भजनाच्या ध्वनिमुद्रिका प्रकाशित झाल्या आहेत. आकाशवाणी मुंबईवर ऐसी अक्षरे या कार्यक्रमात ललितबंध सादरीकरण केले आहे. कुरूळ येथे ॲड. प्रसाद पाटील यांच्या पुढाकाराने १९९२मध्ये कुरूळ येथे ही शाळा सुरू झाली. त्यावेळी सुजाता पाटील यांचे बीएड पदवीचे शिक्षणसुद्धा झालेले नव्हते. एमए होऊन एक वर्ष शाळेत शिकवण्याचा अनुभव घेतला आणि मग बीएड करायचा निर्णय त्यांनी घेतला. १९९५ साली पुणे येथे बीएड पूर्ण होऊन आल्या आणि विद्यार्थ्यांबरोबरचे शैक्षणिक सहजीवन सुरू झालं ते आजतागायत सुरू आहे. बीएड करून आल्यानंतर तर खूप आदर्शवादी कल्पना त्यांच्या मनात होत्या. नवीन काहीतरी करण्याचा सळसळता उत्साह होता, उमेद होती. ३३ वर्षांपूर्वी अलिबागच्या जवळ असले तरीसुद्धा कुरूळ हे गाव शेतीप्रधान लहान खेडे होते. सुरुवातीला या शाळेत येणारे विद्यार्थीसुद्धा कुरूळ व आजूबाजूच्या खेड्यातून येणारे शेतकरी कुटुंबातले असे होते. त्यातली काही तर सातवीच्या पुढे गावात शाळा नाही, म्हणून एक-दोन वर्ष घरीच राहिलेले आणि मग कुरूळ हायस्कूल सुरू झाल्यावर ही मुले एक-दोन वर्षाच्या गॅपनंतर शाळेत आली.

शाळा छोटी होती, मुलं कमी होती आणि शिक्षकही नव्या दमाचे. त्यामुळे शिक्षक आणि मुलांच्यात छान नातं तयार झालं. काही आठवीत आलेल्या मुलांना अक्षर, अंक ओळखही नव्हती. त्या मुलांना अक्षरशः हाताला धरून शिकवायला सुरुवात केली. मुला-मुलींना अगदी मूलभूत शारीरिक स्वच्छता, नीटनेटकेपणा, उठण्या बसण्याच्या पद्धती इथपासून सगळं शिकवावं लागायचं, पण त्यातून जवळीक घट्ट होत गेली. बहुसंख्य मुलं-मुली स्थानिक होती. त्यांच्या पालकांशी वैयक्तिक ओळखी होत्या. त्यामुळे शाळेचा कोणताही कार्यक्रम असो पालकांचा उत्साही सहभाग असायचा. या सगळ्यातून विद्यार्थी आणि पालक यांच्याबरोबर विश्वासाचं, आपुलकीचं नातं निर्माण झालं.

छोट्याशा चाळवजा इमारतीत नऊ दहा वर्ष काढल्यानंतर शाळेसाठी जागा घेऊन टुमदार इमारत बांधली. नव्या इमारतीत शाळा भरणार याचा आनंद आमच्यापेक्षा मुलांना जास्त होता. २०१३-२०१४मध्ये पालकांच्या आग्रहास्तव सृजन प्राथमिक शाळा सुरू केली. शिशुवर्गापासून ते चौथीपर्यंत असे एक एक वर्ग वाढत गेले. तिथे तर तीन वर्षापासूनची छोटी छोटी मुलं येऊ लागली आणि एका खूप गोड निरागस सहजीवनाची सुरुवात झाली.

ही शाळा आहे ते कुरुळ गाव अलिबागपासून अगदीच जवळ म्हणजे दीड-दोन किमीवर आहे. परिसरात गेल्या १२-१५ वर्षांपासून बांधकाम व्यवसाय आणि हॉटेल, पर्यटन



व्यवसाय चांगलाच भरभराटीस आला आहे. त्यामुळे या व्यवसायांशी निगडित कामगारवर्ग मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होऊन इकडे येत आहे. गेल्या पंधराएक वर्षात कुरूळ गावातही या स्थलांतरित बांधकाम मजुरांचे प्रमाण खूप वाढले. उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या काही भागातून खूप मोठ्या प्रमाणावर हे कामगार येतात. त्यामुळे या शाळेतही इतर प्रांतीय अमराठी भाषक विद्यार्थ्यांचे प्रमाण गेल्या काही वर्षात वाढते आहे.

तसे पाहिले तर दिवसातले पाच-सहा तास विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहवास असतो, पण अगदी खरं सांगायचं तर मनात मात्र २४ तास आणि ३६५ दिवस ही मुलं असतात. थोडे थोडके नाही ३२ वर्ष शिक्षिका, मुख्याध्यापिका म्हणून काम करताना मी माणूस म्हणूनही घडत गेले याचा याचं श्रेय मी ज्यांच्या सहवासात आले त्या शेकडो मुलांना आहे, असे सुजाता पाटील आवर्जून सांगतात.

सुजाता पाटील यांचे शिक्षण बीए (संस्कृत) एमए (मराठी) बीएडपर्यंत झाले आहे. १९९४पासून माध्यमिक विद्यालय, कुरुळ इथे मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. विद्यार्थी सहाय्यता संघाचा सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार, साने गुरुजी या चित्रपटाची निर्मिती करणाऱ्या श्री क्रिएशन्सतर्फे धडपडणारी मुले पुरस्कार, कालकथित स्नेहजाताई रूपवते यांच्या बालकल्याणी या संस्थेमार्फत कै. मधुकरराव चौधरी शिक्षक गौरव पुरस्कार, दै. लोकमततर्फे प्रयोगशील मुख्याध्यापिका म्हणून स्त्रीशक्ती पुरस्कार असे विविध पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.




त्यांच्या कुरूळ हायस्कूलला रायगड जिल्हा मुख्याध्यापक संघाचा स्वच्छ शाळा, सुंदर शाळा पुरस्कार प्राप्त झाला आहे तसेच गेल्याच वर्षी रायगड पोलीस दलाचा सुरक्षित शाळा पुरस्कारदेखील प्राप्त झाला आहे.

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या व इतर अनेक कार्यक्रमात कविता वाचन, परिसंवादात सहभाग, विविध कार्यक्रमांचे सूत्रसंचालन कोकण मराठी साहित्य परिषदेतर्फे दिला जाणारा वाङ्मयीन क्षेत्रातील कार्यकर्तीसाठीचा राजा राजवाडे पुरस्कार २००५-०६ साली त्यांना मिळाला आहे. कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अलिबाग शाखेच्या अध्यक्ष व रायगड जिल्हा उपाध्यक्ष म्हणूनदेखील त्यांनी काम पाहिले आहे. राज्य स्तरावरील ॲक्टिव्ह टीचर्स फोरम या प्रयोगशील शिक्षक संघटनेत त्या सक्रीय आहेत. संगीत भजनांच्या मैफिलीचे निवेदन आणि निरूपण त्या करतात. त्याच्या ध्वनिमुद्रिका प्रकाशित आहे. वर्तमानपत्रातून शैक्षणिक, ललित लेखन करीत असतात.

■ **प्रकाश सोनवडेकर,** अलिबाग

## कार्यतत्पर बीडीओ दिप्ती गाट

पोलादपूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारीपदी दिप्ती भरत गाट यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर काहीशा भुवया उंचावलेल्या पोलादपूकरांच्या अपेक्षांपेक्षा मोठी मजल प्रशासकीय कामकाजातून मारून शासनाच्या विविध योजनांची यशस्वी अंमलबजावणी केली. 'उमेद'सारख्या स्वतंत्र संस्थेच्या माध्यमातून पोलादपूर तालुक्यात दोन कोटी ११ लाखांचे कर्जवाटप महिला बचतगटांना करून महिला सक्षमीकरणाद्वारे 'पुरूषांसाठी खेड्याकडे चला'ची साद घालण्यात दिप्ती गाट यांचे यशस्वी प्रयत्न कारणीभूत ठरले आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील हुपरीसारख्या ग्रामीण भागातून शिवाजी विद्यापीठामधून बीबीए पदवी अभ्यासक्रमात टॉपर राहिलेल्या दिप्ती गाट यांनी एसएनडीटी विद्यापीठातूनही एमबीए फायनान्स शाखेमध्ये टॉपर होत उच्चविद्याविभूषित होऊनही सततच्या अभ्यासू वृत्तीमुळे त्यांची २०१८ साली महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शासकीय अधिकारीपदी निवड झाली. परिविक्षाधिन काळात रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यात गटविकास अधिकारी म्हणून पहिल्यांदाच रूजू होताना दिप्ती गाट यांनी या काळात महिलांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत उमेद अभियानामुळे झालेला बदल या विषयावर प्रबंध तयार करीत एमए ही पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. या काळात कोविडचा लॉकडाऊन सुरू असताना कोविड सेंटरच्या व्यवस्थापनाची जबाबदारीदेखील त्यांनी आव्हानात्मक परिस्थितीत स्वीकारली.

२०२४मध्ये दिप्ती गाट यांनी पोलादपूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारीपदाचा कार्यभार स्वीकारला. उच्चशिक्षित असूनही प्रशासनामध्ये थेट जनतेशी संबंध येऊ शकेल अशा पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर कर्तव्यदक्षतेमुळे वयाच्या आणि अनुभवाच्या कमतरतेचा अभाव जाणवत नाही, अशा प्रकारे पंचायत समिती सदस्य आणि जिल्हा परिषदेच्या सदस्यांची मुदत संपल्यानंतर रूजू होऊनही लोकनियुक्त प्रतिनिधींना सन्मानाने शासकीय उपक्रमांमध्ये सहभागी करून घेत अनेक लोकाभिमुख उपक्रमांना योग्यरितीने जनतेपर्यंत पोहचविले. यात प्रामुख्याने त्यांनी उमेद अभियानाबाबत संगमेश्वर येथे सादर केलेल्या प्रबंधानुसार पोलादपूर तालुक्यातील लोहारे आणि देवळे या दोन जिल्हा परिषद गटांमध्ये ४२ ग्रामपंचायतींतर्गत ४३ ग्रामसंघांमध्ये ५२८ महिला बचत गटांमध्ये दोन कोटी १० लाखांचे बँक कर्जवाटप करण्याची योजना उमेद या स्वतंत्र संस्थेमार्फत कार्यान्वित करून महिलांमध्ये उद्यमशीलतेत गतिमानता आणली. यामुळे शहराकडे गेलेल्या पुरूषांना 'खेड्याकडे चला' अशी साद बचत गटांद्वारे उद्यमशीलतेतून आर्थिकदृष्ट्या सक्षम झालेल्या महिलांनी घालण्यास सुरूवात केली आहे. यात उमेद अभियानांतर्गत महिलांसाठी विविध मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करून महिलांना संघटितपणे बचत गटाची चळवळ राबविण्यास उद्युक्त केले.

अलिकडे, पोलादपूर तालुक्यात प्रथमच महिला शेतकरी उत्पादक संस्था स्थापन करीत एक वेगळेच दालन महिलांसाठी खुले केले आहे. अवजार बँकेची निर्मिती पोलादपूर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरली असून अनुसुचित जमातीसाठी बिरसा मुंडा कृषी क्रांती आणि अनुसुचित जातीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनांचा लाभ घेण्यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यासाठीचे प्रयत्न पंचायत समितीच्या कृषी विभागामार्फत गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांनी यशस्वी केले आहेत.



पोलादपूर पंचायत समितीच्या ग्रामपंचायत अधिकारीवर्गाची संख्या वाढविण्यातही यशस्वी झाल्याने तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या कारभारामध्ये सुसूत्रता आणण्याचे काम गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांच्या पाठपुराव्याने झाले आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची मुदत वाढल्यानंतर ७ जानेवारी रोजी पोलादपूर तालुक्यात अधिकाधिक वनराई बंधारे बांधण्याचा उपक्रम एकाचदिवशी राबवून पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त गुरांच्या पिण्याचे पाणी, महिलांना कपडे, भांडी धुण्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्याचे यशस्वी प्रयत्न केले. रोजगार हमी योजनेंतर्गत तालुक्यात पहिल्यांदाच गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांच्या माध्यमातून रोजगारदूतांकरवी शेकडो लोकांना रोजगार मिळाला आणि पहिला गोठा बांधकामाचा प्रकल्प गोळेगणी येथे साकारण्यात आला, तर तालुक्यात अनेक ठिकाणी विहिरींचे बांधकामही सुरू झाले आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पूर्वीपासून फारच प्रस्ताव असूनही अत्यल्प घरकुले मंजूर होत असत. याप्रकरणी विशेष लक्ष देऊन गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांनी प्रस्तावित घरकुलांच्या ६० टक्के घरकुलांना मान्यता मिळविल्याने गोरगरीबांच्या डोक्यावर छप्पर साकारले गेले आहे.

अहिल्यानगरच्या शेवगाव येथे माझी वसुंधरा अभियानामध्ये सहभागी होण्याचा जुजबी अनुभव घेतलेल्या गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांनी पोलादपूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी (गट-१)पदी रूजू झाल्यानंतर पूर्णपणे सक्रिय सहभाग घेतला. यामुळे कोकण विभागस्तरावर सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या गटविकास अधिकारी म्हणून त्यांची निवड जाहीर झाली आहे. आता प्रशासनात त्या सरावल्या असून जनताभिमुख कारभारामुळे तसेच महिला सक्षमीकरणाच्या यशस्वी प्रयत्नांमुळे त्यांची पोलादपूर तालुक्यातील गावागावात ओळख निर्माण झाली आहे.

■ **शैलेश पालकर,** पोलादपूर



## समाजासाठी समर्पित व्यक्तिमत्व इशिका शेलार

सामाजिक बांधिलकी, संवेदनशीलता आणि निस्वार्थ सेवाभाव यांचा सुंदर संगम म्हणजे इशिका शेलार यांचा जीवनप्रवास. समाजातील दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांसाठी सतत कार्यरत राहून त्यांनी स्वतःला एक विश्वासार्ह सामाजिक नेतृत्व म्हणून सिद्ध केले आहे.

कोरोना महामारीच्या कठीण काळात रायगड जिल्ह्यात पहिली महिला म्हणून मृत कोरोना रुग्णांचे अंत्यविधी पार पाडण्याचे धाडस त्यांनी दाखवले तसेच एका फाऊंडेशनच्या माध्यमातून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी मोफत जेवणाची व्यवस्था करून त्यांनी मानवतेचा आदर्श घालून दिला.



वीट भट्टी कामगारांच्या मुलांसाठी सुरू केलेली निसर्ग शाळा ही संकल्पना संपूर्ण महाराष्ट्रात प्रेरणादायी ठरली. सलग चार वर्षे सामुदायिक विवाह सोहळ्यांचे यशस्वी आयोजन, शैक्षणिक मार्गदर्शन, सायबर गुन्हे जनजागृती, लैंगिक शिक्षण, आदिवासी समुपदेशन यांसारखे उपक्रम त्यांनी सातत्याने राबवले.

होळीच्या सणात गरजू मुलांना पुरणपोळी वाटप, अंध व वृद्धांसाठी आरोग्य व पोषण उपक्रम, मुक्या प्राण्यांसाठी अन्नदान, मनोरुग्ण व विद्यार्थ्यांसाठी मदतकार्य, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आरोग्य व कौशल्यविकास नियोजन अशी त्यांची कार्यसूची अतिशय व्यापक आहे.

आदिवासी समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी स्वतः पुढाकार घेऊन जातीचे दाखले, शिक्षण, आरोग्य व रोजगार यासाठी मार्गदर्शन करणे, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न करणे हे त्यांच्या कार्याचे विशेष वैशिष्ट्य आहे.

समाजातील योगदानाची दखल घेत त्यांना विविध मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे. मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते रायगड जिल्हा नवदुर्गा पुरस्कार, धीरज कुमार यांच्या हस्ते 9th International Excellence Award, खासदार श्रीरंग बारणे यांच्या उपस्थितीत आदर्श शिक्षिका सन्मान, खालापूर तहसील व नगर परिषद सन्मान, समाजरत्न व स्त्रीत्वाचा गौरव पुरस्कार हे सर्व पुरस्कार त्यांच्या सेवाभावी वृत्तीची पावती आहेत.

इशिका शेलार या विविध संस्थांमध्ये सक्रिय भूमिका बजावत आहेत. यात ज्या अश्वपरीस फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष, खोपोली पोलीस महिला दक्षता समिती सदस्य, Voice of Mediaच्या जिल्हा Health Co-ordinator, न्यूज जर्नलिस्ट असोसिएशन महाराष्ट्राच्या महिला अध्यक्ष, मानवी हक्क फेडरेशनच्या तालुकाध्यक्ष म्हणून सक्रिय आहेत.

कोणत्याही पुरस्कारासाठी नव्हे, तर समाजासाठी काहीतरी देण्याच्या भावनेतून काम करणे हेच त्यांचे जीवनतत्त्व आहे. समाजाचे आपण देणे लागतो या विचारातून महिला सक्षमीकरण, कौटुंबिक वाद सोडवणे, समाज जागृती आणि सर्वांगीण विकासासाठी त्या सातत्याने कार्यरत आहेत.

इशिका शेलार यांचा प्रवास हा केवळ वैयक्तिक यशाचा नाही, तर समाज परिवर्तनाचा प्रेरणादायी अध्याय आहे. निस्वार्थ सेवा, संवेदनशील नेतृत्व आणि अखंड कार्यशीलता यांच्या बळावर त्यांनी समाजात विश्वास निर्माण केला आहे. समाजाप्रती असलेली ही निष्ठा आणि समर्पण भविष्यातही अनेकांना प्रेरणा देत राहील यात शंका नाही. महिला दिनाच्या निमित्ताने अशा कर्तृत्ववान महिलांना सलाम! त्यांच्या कार्यातून समाजाला प्रेरणा मिळो आणि प्रत्येक स्त्रीने स्वतःच्या क्षमतेची जाणीव ठेवून पुढे जावे, हीच शुभेच्छा. स्त्री ही शक्ती आहे, स्त्री ही प्रेरणा आहे आणि स्त्रीच समाजाच्या प्रगतीची खरी दिशा आहे.

■ **अरुण नलावडे,** खालापूर



## ग्रामीण शिक्षणासाठी झटणाऱ्या मुख्याध्यापिका मनीषा मोरे

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी सातत्याने परिश्रम घेणाऱ्या माणगाव येथील सुधाकर नारायण शिपूरकर आणि गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यम शाळेच्या हरहुन्नरी व्यक्तिमत्व असलेल्या मुख्याध्यापिका मनीषा स्वप्नील मोरे यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवत २०२५-२०२६ या वर्षासाठीचा 'बेस्ट प्रिन्सिपल अवॉर्ड' पटकावला आहे. याचबरोबर त्यांना विविध शैक्षणिक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांच्या या यशामुळे शैक्षणिक क्षेत्रात तसेच ग्रामीण भागात अभिमानाची भावना व्यक्त झाली आहे. विद्यार्थ्यांना बालवयापासूनच संस्कारक्षम शिक्षण देऊन त्यांना घडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न मनीषा मोरे या करीत आहेत.



मनिषा मोरे या एमकॉम, बीएड, डीएसएम तसेच एमए अशा उच्च शैक्षणिक पात्रता धारक असून त्यांना शिक्षण क्षेत्रात ११ वर्षांचा अनुभव आहे. अध्यापनापासून प्रशासनापर्यंतच्या प्रत्येक जबाबदारीत त्यांनी प्रामाणिकपणे काम करत शाळेचा सर्वांगीण विकास साधला आहे. मनिषा मोरे या माणगाव येथील माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर आणि गणेश यशवंत वाघरे या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुख्याध्यापिका म्हणून गेली ११ वर्षे उत्कृष्ट कार्य करीत आहेत. त्यांना डॉ. किरण बेदी आणि जगप्रसिद्ध खेळाडू सायना नेहवाल यांच्या हस्ते उत्कृष्ट मुख्याध्यापिका म्हणून पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेत शैक्षणिक गुणवत्ता, शिस्त, सांस्कृतिक उपक्रम, कला, क्रिडा आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती झाली आहे. मनिषा मोरे या मागील सहा वर्षांपासून Private School Principals Association (PSPA)च्या सक्रिय सदस्य आहेत. या माध्यमातून त्यांनी खासगी शाळांच्या प्रगतीसाठी, शैक्षणिक धोरणांवरील चर्चेसाठी आणि शिक्षकांच्या सक्षमीकरणासाठी मोलाचे योगदान दिले आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार इंग्रजी शिक्षण मिळावे, त्यांच्या अंगी दडलेल्या गुणांना वाव मिळावा यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, मार्गदर्शन सत्रे, करिअर काउन्सेलिंग तसेच विविध स्पर्धा, अभिनव व नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. त्यांच्या या समर्पित कार्यामुळे अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आले असून पालकांमध्येही शिक्षणाबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला आहे.

मनीषा स्वप्निल मोरे यांचे कार्य केवळ वैयक्तिक यश नसून ग्रामीण शिक्षण व्यवस्थेचा गौरव आहे. त्यांचे कार्य भविष्यातील शिक्षण क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरणार आहे यात शंका नाही.

■ **सलीम शेख,** माणगाव



भारतीय जनता पार्टीचे कर्तव्यदक्ष, अभ्यासू व कार्यकर्त्यांचे नेहमी मार्गदर्शक असलेले
मा.श्री.सतिश धारप साहेब
जिल्हा सरचिटणीस, भाजपा
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा..!
08 मार्च
संघटनेप्रती निष्ठा,
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!
सौ.हेमा दिगंबर मानकर
दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस भाजपा



भाजप दक्षिण रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस
मा. श्री.
सतीशजी धारप
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दीक शुभेच्छा!
शुभेच्छुक
सुमित मोहन पवार
(बांधकाम सभापती , महाड नगरपरिषद)


समर्पण, सेवा आणि
मजबूत नेतृत्व....
८ मार्च
भाजप दक्षिण रायगड जिल्हा
संघटन सरचिटणीस
मा. श्री.
सतीशजी
धारपसाहेब
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दीक शुभेच्छा!
शुभेच्छुक
मनस्वी महेश मोहिते
उपाध्यक्षा, महिला मोर्चा भाजप
दक्षिण रायगड जिल्हा
ॲड. महेश मोहिते
जिल्हा सरचिटणीस,
भाजप दक्षिण रायगड


०८ मार्च
रायगडच्या राजकारणातील
चाणक्य, गुरुवर्य
मा. श्री.
सतीशजी
धारप साहेब
आपणांस
वाढदिवसाच्या
हर्दिक शुभेच्छा...!
शुभेच्छुक
श्री. निलेश कुंडलिक थॊरे
सौ. रचना निलेश थॊरे


भाजप दक्षिण रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस
मा. श्री.
सतीशजी
धारपसाहेब
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा !
श्री. गणेश पाटील
अध्यक्ष : भाजपा
युवा विधानसभा - पेण
श्री. आदित्य पाटील
मा. उपसरपंच
तरणखोप
श्री. संजय डंगर
पेण मंडळ अध्यक्ष व
पेण पंचायत समिती सदस्य



सेवा, संघर्ष
आणि नेतृत्व...
८ मार्च
भाजप दक्षिण रायगड जिल्हा
संघटन सरचिटणीस
मा. श्री.
सतीशजी
धारपसाहेब
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दीक शुभेच्छा!
शुभेच्छुक
मंगेश दळवी
उपाध्यक्ष, भाजप
दक्षिण रायगड जिल्हा


०८ मार्च
संकल्प असावेत नवे तुमचे
मिळाव्यात त्यांना नव्या
दिशा प्रत्येक स्वप्न पूर्ण
व्हावे तुमचे
भाजपा रायगड लोकसभा प्रमुख
मा.श्री.सतीश जी धारप
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
नागेंद्र उमेश राठोड
NagendraRathore NagendraRathore


८ मार्च
दक्षिण रायगडचा
बुलंद आवाज
भाजप दक्षिण
रायगड
जिल्हा संघटन
सरचिटणीस
मा. श्री.
सतीशजी
धारपसाहेब
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याचा
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
प्रशांत शिंदे, सरचिटणीस
भाजप दक्षिण रायगड जिल्हा


आधारवड
सतीशजी
धारप
आपणास
वाढदिवसाच्या
हार्दिक
शुभेच्छा..!
शुभेच्छुक
श्री. वैकुंठ रवीशेठ पाटील
रायगड जिल्हा परिषद सदस्य, भाजप
दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस
सौ. शर्मिला वैकुंठ पाटील
उपाध्यक्षा - भाजपा महिला मोर्चा
दक्षिण रायगड जिल्हा


०८ मार्च
व्हावे सकल जनांचे हित हेच आमुचें ध्येय!
भाजप दक्षिण रायगड जिल्हा
संघटन सरचिटणीस
मा.श्री.सतीशजी
धारप साहेब
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक :
प्रभाकर वासुदेव म्हात्रे (हरिओम)
रायगड जिल्हा परिषद सदस्य


८ मार्च
सेवाभावातून
घडलेले नेतृत्व..
भाजप दक्षिण
रायगड
जिल्हा संघटन
सरचिटणीस
मा. श्री.
सतीशजी
धारपसाहेब
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
सौ. गीताताई पालरेचा
माजी नगराध्यक्षा, पाली नगरपरिषद
अध्यक्षा : सुधागड एज्युकेशन सोसायटी